सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २५ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ४१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रत्नागिरीत तरुणाची कोयत्याने हत्या

रत्नागिरी :रत्नागिरीतील कुवारबाव येथे २५ वर्षीय सूरज झोरे याची कोयत्याने हत्या करण्यात आली. मैत्रिणीला दिलेल्या सल्ल्याच्या रागातून तिघांनी हा खून केल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली असून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. घटनास्थळी उपस्थित असलेली तरुणी फरार असून पोलिस तिचा शोध घेत आहेत.

## पुणे-सातारा प्रवास फक्त १ तासात

पुणे : पश्चिम महाराष्ट्रातील प्रवासी पुणे ते सातारा मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. पुणे-बंगळुरू महामार्गावर अपघातांचे वाढते प्रमाण आणि वाहतूक कोंडी पाहून या भागांत पायाभूत सुविधा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. NH-Iच्या या उपाययोजनांमुळे पुणे ते सातारा कॉरिडोरवरील वाहतूक सुलभ होण्याची शक्यता आहे.

## मच्छिमार बोट बुडाली!

वेंगुर्ला : येथे आज पहाटे अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने शिरोडा - केरवाडी येथून समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेलेली बोट बुडाली. यात केरवाडी येथीलच राजन सारंग (वय ४६) हे बेपत्ता झाले आहेत. तर होडीचे मालक प्रकाश सारंग व त्यांचा मुलगा दाजी सारंग यांना वाचवण्यात दुसऱ्या होडीला यश आलं आहे.

## मध्य रेल्वेच्या प्रवाशांचा खोळंबा,

ठाणे : रविवारी सकाळी लोकलने प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांच मोठा खोळंबा झाला. मध्य रेल्वेची वाहतूक सेवा पहाटेच्या सुमारास विस्कळीत झाली. त्यामुळे तब्बल एक ते दीड तास लोकल सेवा बंद होती. रविवारी मेगा ब्लॉकमुळे आधीच अनेक लोकल रद्द झालेल्या असतात. त्यात ऐन वेळी लोकल खोळंबल्याने सकाळी घराबाहेर पडलेल्यांचे मोठे हाल झाले.

## दुचाकी अपघातात एक ठार दुसरा जखमी

रायगड : पोलादपूर तालुक्यातील वाकण गाव हद्दीतील भगतवाडी येथे झालेल्या भीषण दुचाकी अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा युवक गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ही दुर्घटना पोलादपूरकडून गावाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर घडली.

## राज्यातील ५ खासदारांना 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर

नवी दिल्ली : आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी महत्त्वाच्या विविध मुद्यांवर तसेच अर्थसंकल्पावर, सरकारच्या धोरणांवर बाजू भक्कमपणे मांडून संसदेसह देशाचे लक्ष वेधणारे, विविध विभागांवर प्रश्नोत्तरे विचारणारे, संसदेतील उपस्थितीत अव्वल असणारे ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांना सलग दुसऱ्या वर्षी मानाचा ऋसंसद रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. आपल्या खासदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये नरेश म्हस्के यांना पहिला ऋसंसद रत्न' मागील वर्षी पुरस्कार प्राप्त झाला होता. यावर्षी देखील सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार जाहीर झाल्याने ठाणेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच संसदेत आपल्या अभ्यासपूर्ण आणि धडाकेबाज भाषणांनी विरोधकांची झोप उडविणारे खासदार श्रीकांत शिंदे यांनाही दुसऱ्यांदा 'संसद रत्न ' पुरस्कार जाहीर झाला आहे.

## 'कॉकरोच जनता पार्टी'च्या अकाऊंट्सवर बंदी

अहिल्यानगर: मागील काही दिवसांपासून सोशल मीडियासह राजकीय वर्तुळात 'कॉकरोच जनता पार्टी' या उपरोधिक डिजिटल संघटनेनं धुमाकूळ घातला असून या संघटनेनं सरकारवर केलेल्या आरोपांची चर्चा होत आहे. सरकार तरुणांचा आवाज दडपण्यासाठी विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरील आमचे अकाऊंट्स बंद करण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी केला आहे.

# महायुद्ध थांबणार! डोनाल्ड ट्रम्प

## युद्धबंदीचा ऐतिहासिक करार अंतिम टप्प्यात

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : गेल्या ४ महिन्यांपासून संपूर्ण जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवलेले अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील भीषण युद्ध आता थांबण्याची चिन्हे आहेत. दोन्ही देशांमधील चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली आहे, अशी ऐतिहासिक घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. शनिवारी रात्री ट्रम्प यांनी या अत्यंत महत्त्वाच्या घडामोडीची माहिती दिली. या संभाव्य करारामध्ये जागतिक व्यापारासाठी आणि कच्च्या तेलाच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली होर्मुझची सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय जहाजांसाठी पुन्हा पूर्णपणे खुली करण्याचाही समावेश आहे.



दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या ऐतिहासिक कराराची अधिकृत घोषणा करण्यापूर्वी मध्यपूर्वेतील आणि आशियातील प्रमुख देशांच्या प्रमुखांशी फोनवर महत्त्वाची चर्चा केली. यामध्ये कतार, सौदी अरेबिया, यूएई, पाकिस्तान, जॉर्डन, इजिप्त, टर्की आणि बहरीन यांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशीही स्वतंत्रपणे चर्चा करून त्यांना या कराराच्या प्रगतीची माहिती दिली. तसेच त्यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' अकाउंटवर माहिती देत लिहिले की, 'आम्ही अजूनही या कराराच्या अंतिम मुद्द्यांवर बारकाईने चर्चा करत आहोत, लवकरच याची अधिकृत घोषणा केली जाईल.' या पार्श्र्वभूमीवर इजिप्तनेही सर्व बाजूंना या राजनैतिक संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

या चर्चेनंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी सांगितले की, त्यांचा देश अमेरिका आणि इराणमधील संवाद सुलभ करण्यासाठी आपले प्रयत्न सुरूच ठेवणार आहे. तसेच आगामी काळात इस्लामाबादमध्ये अमेरिका-इराण दरम्यान पुढील उच्चस्तरीय चर्चा आयोजित करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच टर्कीचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यप एर्दोगन यांनीही या प्रगतीबद्दल सकारात्मकता दर्शवली आहे. कारण या ऐतिहासिक करारामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारी जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या मार्गातून कोणत्याही अडथळ्याविना आणि कराविना सुरक्षितपणे ये-जा करता येणार आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प इराणला शांतता करारावर स्वाक्षरी न केल्यास गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल अशी धमकी देत होते. शनिवारीच त्यांनी इराणच्या नकाशावर अमेरिकेचा झेंडा असलेला एक आक्रमक फोटो पोस्ट केला होता. ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले की, 'आपण इराणवर पुन्हा एकदा भीषण लष्करी हल्ला करण्याच्या अगदी जवळ होतो. पण आखाती देशांच्या विनंतीवरून हे हल्ले सध्या थांबवण्यात आले आहेत.' मात्र, या प्रचंड तणावानंतर अखेर दोन्ही बाजू युद्धाऐवजी राजकीय तोडगा काढण्यास तयार झाल्याने जागतिक अर्थव्यवस्थेने आणि कोसळलेल्या आंतरराष्ट्रीय तेल बाजाराला मोठा दिल-

## इबोलाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा नागरिकांना सल्ला

## काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानचा प्रवास टाळा

वृत्तसंस्था




नवी दिल्ली : इबोला प्रभावित देशांतील बदलती परिस्थिती आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) शिफारशी लक्षात घेऊन केंद्र सरकारने सर्व भारतीय नागरिकांना पुढील सूचना मिळेपर्यंत काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान येथे अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. काँगो, युगांडा तसेच त्यांच्या सीमेला लागून असलेल्या दक्षिण सुदान आणि इतर देशांमध्ये हा आजार पसरण्याचा सर्वाधिक धोका असल्याचे सांगण्यात आले आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने हा सल्ला जारी केला आहे. या सल्ल्यानुसार, सध्या या देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या किंवा प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थानिक प्रशासनाने जारी केलेल्या सार्वजनिक आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि अतिरिक्त खबरदारी घ्यावी, असे सांगण्यात आले आहे. डब्ल्यूएचओच्या आपत्कालीन समितीने २२ मे रोजी प्रवेशबिंदूंवरील रोगनियंत्रण आणि देखरेख अधिक मजबूत करण्यासाठी काही तात्पुरत्या शिफारशी जारी केल्या आहेत. या शिफारशींमध्ये 'बुंडिबुग्यो विषाणू आढळलेल्या भागांमध्ये प्रवास टाळावा' असा सल्लाही देण्यात आला आहे.

भारतात बुंडिबुग्यो विषाणू स्ट्रेनमुळे होणाऱ्या इबोला आजाराचा अद्याप एकही रुग्ण आढळलेला नाही. इबोला हा एक विषाणूजन्य रक्तस्रावी तापाचा आजार असून तो इबोला विषाणूच्या 'बुंडिबुग्यो' स्ट्रेनमुळे होतो. हा अत्यंत गंभीर आजार असून त्यामध्ये मृत्यूदरही मोठ्या प्रमाणात आहे. सध्या बुंडिबुग्यो स्ट्रेनमुळे होणाऱ्या इबोला आजाराच्या प्रतिबंधासाठी किंवा उपचारासाठी कोणतीही लस अथवा विशेष उपचार पद्धतीला मान्यता देण्यात आलेली नाही.

# मुंबई - पुणे अंतर ९० मिनिटात पूर्ण होणार!

## १५ हजार कोटींच्या नव्या एक्स्प्रेसवेमुळे वेळही वाचणार

तभा वृत्तसेवा

मुंबईः मुंबई-पुणे प्रवासाचा वेळ आता आणखी कमी होण्याची शक्यता आहे. सध्याच्या मुंबई-पुणे एक्सप्रेसवेला समांतर नवा एक्सप्रेसवे उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी प्रक्रिया सुरू केली असून, भविष्यात मुंबई ते पुणे प्रवास अवघ्या ९० मिनिटांत पूर्ण होऊ शकतो. या नव्या एक्सप्रेसवेसाठी तब्बल १५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाचा सविस्तर अहवाल आणि व्यवहार्यता चाचणीसाठी एनएचएआयने निविदा मागवल्या आहेत. त्यामुळे प्रकल्प प्रत्यक्षात येण्याच्या दृष्टीने हालचालींना वेग आल्याचे मानले जात आहे.




प्रस्तावित मार्ग १३० किलोमीटर लांबीचा असणार आहे. हा पूर्णपणे नियंत्रित प्रवेश असलेला एक्सप्रेसवे असेल. रायगड जिल्ह्यातील चौक येथून या मार्गाची सुरुवात होणार आहे. पुढे तो जेएनपीटी-पागोटे मार्गाला जोडला जाईल. त्यानंतर भोरजवळील शिवरे गावापर्यंत हा मार्ग जाणार असून, तिथे तो पुणे रिंग रोडशी जोडला जाईल. या नव्या मार्गामुळे पुणे ते अटल सेतू अशी थेट जोडणी निर्माण होणार आहे. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई आणि जेएनपीटी बंदरापर्यंत पोहोचणे अधिक सोपे होणार आहे.

सध्याच्या मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेषतः विकेंड आणि सुट्ट्यांमध्ये प्रचंड वाहतूक कोंडी पाहायला मिळते. घाट परिसरात वारंवार अपघातही घडतात. याच पार्श्र्वभूमीवर समांतर एक्सप्रेसवेचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. हा नवा एक्सप्रेसवे ८ पदरी असणार आहे. दररोज जवळपास ३ लाख वाहने या मार्गावरून धावू शकतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मालवाहतुकीलाही मोठा फायदा होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी डिसेंबर २०२५ मध्ये या समांतर एक्सप्रेसवेची घोषणा केली होती. त्यानंतर आता प्रत्यक्ष प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

पागोते ते चौक या पहिल्या टप्प्याला मंजुरी मिळाली आहे. संपूर्ण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे-मुंबई प्रवास दीड तासांत होईल, असे गडकरी यांनी म्हटले होते.

याचसोबत पुणे-छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे प्रकल्पालाही गती दिली जात आहे. या मार्गामुळे दोन्ही शहरांतील प्रवास अवघ्या दोन तासांवर येण्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच तळेगाव-चाकण-शिक्रापूर उन्नत मार्ग प्रकल्पही महत्त्वाचा मानला जात आहे.

या मार्गावर रस्ता, उड्डाणपूल आणि मेट्रो अशी बहुस्तरीय वाहतूक व्यवस्था उभारली जाणार आहे. एनएचएआयचे अधिकारी संजय कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा नवा एक्सप्रेसवे भविष्यातील मुंबई-बेंगळुरू महामार्गाचाही महत्त्वाचा भाग ठरणार आहे.

# बारामुल्लामध्ये दहशतवाद्यांच्या ठिकाणाहून मोठा स्फोटक साठा जप्त

वृत्तसंस्था



श्रीनगर : उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत दहशतवाद्यांच्या संशयित ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात स्फोटक दारुगोळा जप्त केला आहे. या कारवाईमुळे संभाव्य दहशतवादी कट उधळण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले असून परिसरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

अधिकृत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बारामुल्ला जिल्ह्यातील नीलसर कांडी परिसरात दहशतवाद्यांची हालचाल असल्याची गुप्त माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर बारामुल्ला पोलीस, ५२ राष्ट्रीय रायफल्स आणि केंद्रीय राखीव पोलीस दल (उठझऋ) यांनी संयुक्त शोधमोहीम राबवली. घनदाट जंगल आणि डोंगराळ भागात अनेक तास चाललेल्या या कारवाईदरम्यान सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणाचा शोध घेत मोठा शस्त्रसाठा जप्त केला.

या मोहिमेत १४ राउंड ओजी-७व्ही रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड (ठझऋ) आणि ९ राउंड पीजी-७पी रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड जप्त करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य सापडल्याने सुरक्षा यंत्रणांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. प्राथमिक तपासानुसार, हा साठा सुरक्षा दलांवर मोठा हल्ला घडवून आणण्यासाठी वापरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सुरक्षा दलांनी जप्त केलेला हा स्फोटक साठा अत्यंत धोकादायक स्वरूपाचा असून त्याचा वापर लष्करी वाहनांवर किंवा सुरक्षा चौक्यांवर हल्ल्यासाठी केला जाऊ शकतो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईनंतर परिसरात अतिरिक्त सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून संशयित दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी कॉम्बिंग ऑपरेशन अधिक तीव्र करण्यात आले आहे.

दरम्यान, वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांनी या संयुक्त कारवाईचे कौतुक केले आहे. पोलीस, सेना आणि सीआरपीएफ यांच्यातील समन्वयामुळेच ही मोठी कारवाई यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले. उत्तर काश्मीरमध्ये शांतता आणि सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या समन्वित मोहिमा सातत्याने राबवल्या जात आहेत. दहशतवाद्यांचे कोणतेही षड्यंत्र हाणून पाडण्यासाठी सुरक्षा दल पूर्णपणे सज्ज आहेत, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# ४ महिलांचा बळी घेणारी टी-२ वाघीण अखेर जेरबंद

तभा वृत्तसेवा

चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही वनपरिक्षेत्रात चार महिलांचा बळी घेणाऱ्या टी-२ वाघिणीला अखेर वनविभागाने शनिवारी रात्री जेरबंद करण्यात यश मिळवले. गेल्या काही दिवसांपासून या नरभक्षक वाघिणीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गुंजेवाही जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या १३ महिलांच्या गटावर टी-२ वाघिणीने अचानक हल्ला चढवला होता. दबा धरून बसलेल्या वाघिणीच्या हल्ल्यात चार महिलांचा जागीच मृत्यू झाला. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर मानवी जीवितहानी झाल्याची ही महाराष्ट्रातील दुर्मिळ आणि धक्कादायक घटना मानली जात आहे. या



घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. वनविभागाने तातडीने कारवाई करून वाघिणीचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरत होती.

या हल्ल्यानंतर वनविभागाने विशेष पथक तयार करून गुंजेवाही-पवनपार मार्गावरील खैरीचक जंगल परिसरात मोठी शोधमोहीम सुरू केली. संबंधित वाघिणीला पकडण्यासाठी आवश्यक परवानग्या घेत ट्रॅप आणि ट्रॅन्क्युलायझरची व्यवस्था करण्यात आली होती. वनअधिकाऱ्यांनी जंगलातील हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत ऑपरेशन युद्धपातळीवर राबवले.

शनिवारी सायंकाळी वनविभागाच्या पथकाने ट्रॅन्क्युलायझर डार्टच्या साहाय्याने एका वाघावर अचूक वेध घेतला. मात्र अंधारामुळे सुरुवातीला पकडण्यात आलेला प्राणी हल्लेखोर टी-२ वाघीणच आहे की दुसरा वाघ, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. त्यानंतर वनविभागाने पडताळणी केली असता हीच चार महिलांच्या मृत्यूस कारणीभूत असलेली टी-२ वाघीण असल्याचे स्पष्ट झाले. रात्री आठच्या सुमारास तिला पूर्णपणे जेरबंद करण्यात आले.

# पाकिस्तानात कार बॉम्बचा थरार! लष्कराला घेऊन जाणाऱ्या ट्रेनवर हल्ला

वृत्तसंस्था



बलुचिस्तान : पाकिस्तानच्या अंतर्गत सुरक्षेला मोठा धक्का देणारी एक अत्यंत भीषण घटना समोर आली आहे. बलुचिस्तानच्या राजधानी केट्टा येथे रेल्वे ट्रॅकजवळ झालेल्या बॉम्बस्फोटात किमान २४ जणांचा मृत्यू झाला असून, डझनभर लोक गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. हा स्फोट पाकिस्तानी लष्कराच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या एका विशेष रेल्वे ट्रेनला लक्ष्य करून करण्यात आला आहे. शनिवारी सकाळी केट्टा येथील चमन पट्टकजवळून ही रेल्वे जात असताना, स्फोटकांनी भरलेल्या एका कारने ट्रेनच्या डब्याला धडक दिली, ज्यामुळे हा भीषण स्फोट झाला असून यामागे नेमका कोणाचा हात आहे हे जाणून घेऊया.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्राणघातक हल्ल्यातील मृतांमध्ये मोठ्या संख्येने पाकिस्तानी लष्कराचे जवान आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा समावेश आहे. मंगळवारपासून सुरू होणाऱ्या ईदच्या सुट्ट्या साजरी करण्यासाठी हे सर्वजण ट्रेनने पेशावरकडे निघाले होते. हा स्फोट इतका भीषण होता की ट्रेनचे दोन डबे ट्रॅकवरून घसरून उलटले आणि त्यांनी पेट घेतला. घटनास्थळावरून आकाशात काळ्या धुराचे मोठे लोट उसळताना दिसत होते. स्थानिक नागरिक आणि बचाव पथकाचे जवान ढिगाऱ्याखालून वाचलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न करत आहेत.

या घटनेचे अनेक फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ज्यामध्ये रक्ताने माखलेल्या जखमींना स्ट्रेचरवरून नेले जात असल्याचे दिसत असून, परिसरात सशस्त्र सुरक्षा दलांनी कडेकोड बंदोबस्त तैनात केला आहे. या भीषण स्फोटाची तीव्रता रेल्वे ट्रॅकपासून २५ ते ३० मीटर अंतरापर्यंत जाणवली. तिथे पार्क असलेल्या अनेक गाड्याही जळून खाक झाल्या आहेत. शेजारील एका बहुमजली इमारतीचे मोठे नुकसान झाले आहे. इमारतीच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत आणि भिंती कोसळल्या आहेत.

ज्या परिसरात स्फोट झाला तो परिसर लष्कराच्या छावणीजवळ असल्याने तिथे नेमही कडक सुरक्षा असते, तरीही हा हल्ला झाला. बलोच लिबरेशन आर्मी (इङ-) या संघटनेने या घातक हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. त्यांच्या मजीद ब्रिगेड या फिदाईन पथकाने हा हल्ला घडवून आणल्याचा दावा बीएलएने त्यांच्या अधिकृत निवेदनात केला आहे. इराण आणि अफगाणिस्तानला लागून असलेल्या बलुचिस्तान प्रांतात गेले बरेच दिवस वांशिक फुटीरतावाद्यांकडून बंड होत आले आहे. त्यांना त्यांच्या प्रांताच्या संपत्तीवर नियंत्रण हवे आहे आणि त्यांना अधिक स्वतंत्र व्हायचे आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणूनच बीएलए सारख्या गटांनी पाकिस्तानी सरकार आणि सैन्याविरुद्ध लढा सुरू केला आहे. काही वर्षांपासून या गटाने पाकिस्तानी सुरक्षा दलांवर, तिथल्या सुविधांवर आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोरच्या प्रकल्पांवर हल्ले केले आहेत. या नवीन हल्ल्यामुळे पाकिस्तान आणि चीनमध्ये खूप गदारोळ माजला आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्ग येथे अधिकमासानिमित्त भागवत सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ मे -**
हिंदू धर्मामध्ये पवित्र मानल्या जाणाऱ्या अधिकमास महिन्यानिमित्त नळदुर्ग येथील प्रतिष्ठित नागरिक तथा सेवानिवृत्त वन अधिकारी विनय परळकर आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सेवानिवृत्त व्यवस्थापक सुप्रियाताई परळकर यांच्या निवासस्थानी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २५ मे ते ३१ मे दरम्यान हा भागवत सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. यावेळी वेदशास्त्र संपन्न वेणुगोपाळाचार्य काशीकर यांच्या अमृतमयी वाणीतून भागवत कथा सांगितली जाणार आहे.

रोज सकाळी ८ ते १२ या वेळेत संस्कृतमधून संहितावाचन होणार असून दुपारी ४ ते ६ या वेळेत मराठीतून अर्थानुवाद व कथा निरूपण करण्यात येणार आहे. दि. ३१ मे रोजी भागवत सप्ताहाची सांगता होणार आहे.

नळदुर्ग येथील जगताप नगर परिसरात आयोजित या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परळकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



# तुळजाभवानी मंदिर परिसरात बाल भिक्षुकांचा वाढता विळखा; भाविक त्रस्त, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ मे -**
राज्याचे कुलदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात सध्या बाल भिक्षुकरी आणि भीक मागणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. दररोज हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असताना मंदिर परिसर, मुख्य प्रवेशद्वार, पार्किंग परिसर, प्रसाद विक्री मार्ग तसेच मंदिराच्या पायऱ्यांलगत लहान मुले आणि वृद्धांकडून सातत्याने भीक मागितली जात असल्याने भाविकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे काही बाल भिक्षुकांकडून भाविकांच्या मागे लागून सक्तीने पैशांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

दर्शनासाठी आलेल्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेरगावाहून आलेल्या पर्यटकांना वारंवार अडवून पैसे मागितले जात असल्याने मंदिर परिसरातील धार्मिक आणि शांत वातावरणाला गालबोट लागल्याची भावना भाविकांमधून व्यक्त होत आहे.

दर्शनानंतर अनेक भाविक मंदिरासमोर किंवा परिसरात सेल्फी व ग्रुप फोटो काढण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्याचवेळी काही बाल भिक्षुक अचानक फोटोमध्ये येऊन उभे राहणे, पैसे मागण्यासाठी गर्दी करणे किंवा फोटो काढणाऱ्यांच्या मागे लागणे असे प्रकार सातत्याने घडत असल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

अनेकदा भाविकांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर संबंधितांकडून हात धरून विनवण्या करणे, वाहनांजवळ गर्दी करणे तसेच लहान मुलांना पुढे करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही समोर येत आहे.

दररोज लाखो रुपयांची उलाढाल आणि हजारो भाविकांची वर्दळ असलेल्या तुळजापूरमध्ये मंदिर परिसराची प्रतिमा जपण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाविकांमधून जोर धरत आहे.

### सुरक्षा यंत्रणा बघ्याच्या भूमिकेत?

मंदिर परिसरातील प्रशासकीय भवनासमोरच हे प्रकार सातत्याने घडत असताना मोठ्या प्रमाणात सुरक्षा रक्षक, पोलीस बंदोबस्त आणि मंदिर संस्थानची यंत्रणा तैनात असूनही प्रभावी कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे. अनेक भाविकांनी सुरक्षा रक्षकांकडे तक्रारी करूनही संबंधितांना काही वेळ हटवले जाते; मात्र काही वेळातच पुन्हा तेच प्रकार सुरू होत असल्याचे सांगितले जात आहे.

### पुनर्वसन आणि संयुक्त कारवाईची मागणी

भाविकांच्या मते, मंदिर परिसर 'भिक्षामुक्त' करण्यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी नियोजन करण्याची गरज आहे. बाल भिक्षुकांसाठी पुनर्वसन मोहीम राबविणे, महिला व बालकल्याण विभागाने संयुक्त कारवाई करणे, बाल भिक्षुकरीमागील टोळ्यांची चौकशी करणे तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या गैरवापराबाबत कठोर पावले उचलण्याची मागणी पुढे येत आहे.

## सामाईक बोअरच्या वादातून थरारक खून; कार्ला येथे एकाचा मृत्यु

### युवक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
तुळजापूर तालुक्यातील कार्ला येथे सामाईक बोअरमधील मोटार काढण्याच्या वादातून झालेल्या मारहाणीत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एका युवकाला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाणे येथे चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विष्णु बब्रुवान मोटे, गौतम बब्रुवान मोटे, योगेश गौतम मोटे आणि मनोज गौतम मोटे (सर्व रा. कार्ला, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. २१ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास मयत ब्रम्हदेव बब्रुवान मोटे यांना सामाईक बोअरमधील मोटार आम्हाला न विचारता का काढली, असा जाब विचारत वाद घातला.

वादाचे रूपांतर हाणामारीत होत आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी पाईप, काठी आणि कोयत्याने मारहाण केली. या मारहाणीत ब्रम्हदेव बब्रुवान मोटे यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेले फिर्यादी महेश ब्रम्हदेव मोटे यांनाही आरोपींनी जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## परंड्यात जागा वाटणीच्या वादातून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
जागा वाटणीच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीस गंभीर मारहाण करण्यात आल्याची घटना नृसिंहनगर, परंडा येथे घडली असून या प्रकरणी परंडा पोलीस ठाणे येथे चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शाम सुंदर ताटे, सुरज ताटे (दोघे रा. नृसिंहनगर, परंडा ह.मु. पुणे), तसेच प्रदीप रामराव कदम आणि रितेश कदम (रा. कार्ला, ता. औसा, जि. लातूर) यांनी दि. २० मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास नृसिंहनगर, परंडा येथे फिर्यादी मधुसुदन कानिफनाथ ताटे यांच्याशी जागा वाटणीच्या कारणावरून वाद घातला.

वाद वाढल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून मधुसुदन कानिफनाथ ताटे यांना गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी मधुसुदन कानिफनाथ ताटे यांनी दि.२२ मे २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरावरून परंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ढोकी तेरणा कारखाना वसाहतीतून मोटारसायकल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
तेरणा कारखाना वसाहत, ढोकी येथून अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत राहुल विजय पाटील (वय ३७, रा. तेरणा कारखाना वसाहत, ढोकी ता. जि. धाराशिव) यांनी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांची अंदाजे २५ हजार रुपये किंमतीची हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच २५ सी ४१४४) ही दि. २१ मे २०२६ रोजी पहाटे १.३० ते सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घरासमोरून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी राहुल पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरावरून ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## नारंगवाडी शिवारातील रोहीत्रावरील अल्युमिनियम तार चोरी; ४९ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
तालुक्यातील नारंगवाडी शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी रोहीत्रावरील अल्युमिनियम तार चोरी करून तब्बल ४९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२० मे रोजी रात्री १० वाजल्यापासून ते दि. २१ मे रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत नारंगवाडी शेतशिवारातील गट नं. ७८/१ व ७९/१ येथील रोहीत्रावरील सुमारे १४०० मीटर अल्युमिनियम तार अज्ञात व्यक्तींनी चोरून नेली. चोरीस गेलेल्या मालाची किंमत अंदाजे ४९ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

याप्रकरणी तानाजी विश्वनाथ जाधव (वय ३१, रा. मानेगोपाळ, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दि.२१ मे रोजी उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## समाजसेवेचा मानाचा तुरा! युवा उद्योजक पंडित जळकोटे यांना 'बसवरत्न पुरस्कार' प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील प्रसिद्ध युवा उद्योजक, समाजसेवक तथा धाराशिव जिल्हा बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे यशस्वी संयोजक पंडित जळकोटे यांना सोलापूर मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा मंडळाच्या वतीने यंदाचा मानाचा 'बसवरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. सोलापूरचे पालकमंत्री नामदार जयकुमारजी गोरे यांच्या शुभहस्ते तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार अत्यंत दिमाखदार वातावरणात प्रदान करण्यात आला.

उद्योग क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पंडित जळकोटे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान बहाल करण्यात आला.

समाजहितासाठी सातत्याने पुढाकार घेणे, गरजू व गोरगरीबांना मदतीचा हात देणे तसेच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

धाराशिव जिल्हा बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे संयोजक म्हणूनही त्यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीला नवी दिशा दिली आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा वारसा जपत समाजप्रबोधन आणि सेवाभाव जिवंत ठेवण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केले आहे.

त्यांच्या कार्यामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळत असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत.



पंडित जळकोटे यांना प्राप्त झालेल्या या मानाच्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पंडित जळकोटे यांच्या रूपाने एका कर्तृत्ववान युवा उद्योजक आणि खऱ्या समाजसेवकाचा सन्मान झाला आहे, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

त्यांच्या पुढील सामाजिक आणि व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छाही देण्यात आल्या आहेत.

## येडशीत इनोव्हा कारमधून अवैध विदेशी दारू वाहतूक उघड; ६.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येडशी येथे धडक कारवाई करत इनोव्हा कारमधून सुरू असलेली अवैध विदेशी दारूची वाहतूक उघडकीस आणली. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून वाहनासह तब्बल ६ लाख ३४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.२१ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यात मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणणे, फरारी आरोपींचा शोध घेणे तसेच अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करत होते.

दरम्यान, इनोव्हा कार क्रमांक एमएच १५ बीएक्स ६८२० मधून अवैध दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार सायंकाळी साडेपाचच्या सुमारास संशयित वाहनाला थांबवून तपासणी करण्यात आली. तर मागील सीटवर बसलेल्या इसमाने आपले नाव दादा रामा काळे (वय ४६, रा. जुना बस डेपो, पारधी पिढी, धाराशिव) असे सांगितले. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता कारमध्ये विदेशी दारूचे बॉक्स आढळून आले. त्यानंतर इनोव्हा कारसह विदेशी दारू असा एकूण ६,३४,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी सुभाष काळे व दादा रामा काळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### वाहतूक नियमभंगावर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली.

दि.२२ मे रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर एकूण २१३ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईदरम्यान १ लाख ७७ हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## शेत नांगरण्याच्या वादातून दुधोडीत तुफान मारहाण

### महिलेसह चौघे जखमी, दागिने हिसकावल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
तालुक्यातील दुधोडी येथे शेत नांगरण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका कुटुंबावर लाठी-काठ्यांनी हल्ला करून गंभीर मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी महिलेसह चौघांविरुद्ध भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अतुल रावण महानवर, संगीता रावण महानवर (रा. दुधोडी, ता. भूम), माउली संदीपान महानवर (रा. बावी, ता. भूम) व बबलु संजय तांबे (रा. हाळगाव, ता. जामखेड, जि. बीड) यांनी दि.१८ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास शेत नंबर ३५ च्या बांधावर फिर्यादी मिनिनाथ अजिनाथ महानवर (वय ३५, रा. दुधोडी, ता. भूम) व त्यांच्या आई सिंधुबाई महानवर यांच्यासोबत शेत नांगरण्याच्या कारणावरून वाद घातला.

वादाचे रूपांतर हाणामारीत होत आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच काठी व खोऱ्याच्या दांड्याने मारहाण करून दोघांना गंभीर जखमी केले. दरम्यान, फिर्यादीचे भाऊ रमेश महानवर व वहिनी अश्विनी महानवर हे भांडण सोडवण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांनाही मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तसेच, आरोपींनी अश्विनी महानवर यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण व दीड तोळ्यांचे कानातील झुमके जबरदस्तीने ओढून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याप्रकरणी मिनिनाथ महानवर यांनी दि.२१ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## परंड्यात जुगार अड्ड्यांवर पोलिसांची धडक कारवाई; २९ जण ताब्यात

### १३ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
धाराशिव जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी पुन्हा एकदा धडक मोहीम राबवत परंडा शहरातील ७ चक्री जुगार अड्डे आणि २ अवैध तीन पत्ती (तिरट) क्लबवर मोठी छापेमारी कारवाई केली. या कारवाईत २९ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून तब्बल १३ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक धाराशिव रीतु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली तथा परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दि.२१ मे रोजी ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक विजय आटोळे, सहायक पोलीस निरीक्षक प्रविण सोमवंशी, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र बहुरे तसेच पोलीस अंमलदार व चालकांचा सहभाग होता. सदरील कारवाई गोल्डन चौक, आठवडी बाजार परिसरातील तीन ठिकाणे, गोल्डन चौक, बस स्थानकासमोरील परिसर 'बुलबुल कलेक्शन' समोरील जागा, रमाई चौक परिसर, 'समर्थ जेन्ट्स पार्लर' समोरील जागा, कुर्डुवाडी रोडवरील 'जगताप ढाबा' शेजारील खोली, संत मीरा शाळेमागील करमाळा रोडलगत निळ्या पत्र्याच्या शेडमधील क्लबमध्ये करण्यात आली. सदर छापेमारीदरम्यान एकूण ९ गुन्हे परंडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले असून, आरोपींविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून जुगार साहित्य, रोकड व इतर मुद्देमाल असा एकूण रु. १३,०१,७३३ किमतीचा ऐवज जप्त केला. यामध्ये रु. ४,९३,०३३ रोकड तसेच अंदाजे रु. ८,०८,७०० किमतीचा इतर मुद्देमाल समाविष्ट आहे.



या कारवाईनंतर पोलीस अधीक्षक रीतु खोखर यांनी अवैध व्यवसाय करणाऱ्यांना कठोर इशारा देत जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू आढळल्यास यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

## उमरग्यात जुगार अड्ड्यांवर पोलिसांचे छापे; मटका जुगार प्रकरणी दोन्ही ठिकाणी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**
उमरगा पोलीस ठाणे हद्दीत जुगार विरोधी मोहिमेदरम्यान पोलिसांनी दोन ठिकाणी छापे टाकून मटका जुगार चालविणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत जुगार साहित्य आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली असून दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२१ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.३० ते ७.५० वाजण्याच्या दरम्यान उमरगा पोलिसांनी छापेमारी केली. यावेळी आरोपी अविनाश हरिदास राठोड (वय २५, रा. उमरगा) आणि विकी राठोड (रा. पळसगाव तांडा, ता. उमरगा, जि. धाराशिव) हे अस्टमी बारच्या बाजूच्या मोकळ्या जागेत मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य आणि ७४० रुपयांची रक्कम स्वतःच्या ताब्यात ठेवून जुगार खेळताना आढळले. त्यानंतर दुसऱ्या कारवाईत आरोपी बबलु ख्यामन्ना पुजारी (वय ३३, रा. उमरगा) हे हॉटेल रविराजच्या बाजूला मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य आणि १,१९० रुपयांची रक्कम ताब्यात ठेवून जुगार चालवत असल्याचे पोलिसांना आढळून आले.

दोन्ही ठिकाणांहून पोलिसांनी जुगार साहित्य आणि रोख रक्कम जप्त केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पहिला दगड मारण्याआधी...

**रोखठोक**

दिनेश गुणे



कोणत्याही जीवनशैलीची एक चौकट असते. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि व्यवस्था हे त्या चौकटीचे कोन असतात. यामुळे जीवनशैली परिपूर्ण होते. कोणताही समाज व्यक्ती आणि कुटुंबाविना पूर्ण होत नाही. समाज म्हणजे व्यक्ती आणि कुटुंबांचा समूह असतो आणि जीवनशैलीची घडी विस्कटू नये याकरिता या समूहातूनच व्यवस्था निर्माण केली जाते. म्हणजेच, व्यवस्था आणि समाज या भिन्न बाबी नाहीत. व्यवस्था हादेखील समाजाचाच एक भाग असतो आणि समाजातूनच व्यवस्थेची उभारणी केली जात असते. जेव्हा समाज व्यवस्थेवर नाराज होतो, व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवू लागतो, तेव्हा मात्र, समाज आणि व्यवस्था यांचे अस्तित्व वेगळे असल्याचा संभ्रम निर्माण होतो. समाज हा संवेदनशील असतो. अन्याय, अत्याचार, व्यभिचार, भ्रष्टाचार या बाबी समाजास सहन होत नाहीत. तरीही, हजारो वर्षांपासून अन्याय, अत्याचार होतच राहिले आहेत आणि या बाबींच्या विरोधातील समाजाची संवेदनशीलताही उघड होत गेली आहे. म्हणूनच, येशू ख्रिस्ताच्या काळातील हजारो वर्षांपूर्वीच्या, बायबलमधील त्या कथेचा संदर्भ आजही दिला जातो. त्या काळातील समाजातही व्यभिचार, भ्रष्टाष्टाचार, अन्याय, अत्याचार होत होते आणि तेव्हाही संवेदनशील समाज त्याविरुद्ध पेटून उठत होता. बायबलमधील ती प्रसिद्ध बोधकथा हे त्याचेच उदाहरण आहे. एका महिलेवर व्यभिचाराचा आरोप होतो, तेव्हा समाजात प्रचंड संताप प्रकट होतो. त्या महिलेस भर चौकात शिक्षा करावी असे ठरते आणि दगडांनी ठेचून मारण्यासाठी तिला चौकात आणले जाते. व्यभिचारी महिलेस होणाऱ्या शिक्षेची कार्यवाही पाहण्यासाठी लोकांची चौकात गर्दी होते आणि गर्दीतील प्रत्येक जण हातात दगड घेऊन शिक्षेच्या कार्यवाहीचे भागीदार होण्यासाठी उभा राहतो. अशा व्यभिचारी महिलेस शिक्षा देण्याची समाजाची मानसिकता म्हणजे, एक प्रकारे संवेदनशील समाजाचा व्यभिचाराविरुद्धचा संतापच असतो. पुढच्या काही क्षणांत शिक्षेची कार्यवाही सुरू होणार असते. प्रत्येक जण आपल्या हातातील दगड उंचावतो, तेवढ्यात गर्दीतून येशूचा आवाज येतो, ''ज्याने आयुष्यात कोणतेच पाप केलेले नाही, त्याने पहिला दगड मारावा!'' उंचावलेले हात खाली येतात, गर्दीतील संवेदनशील माणसांच्या माना लाजेने खाली जातात आणि बघता बघता गर्दी पांगते. लोक घरी परततात.

शिक्षा देणारी व्यवस्था आणि समाज यांची दोन रूपे या कथेच्या निमित्ताने आजही स्पष्ट दिसतात. महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील एका गावात सुट्टीच्या निमित्ताने मामाच्या घरी गेलेल्या साडेतीन वर्षांच्या एका चिमुरडीला गोठ्यातले गायीचे वासरू दाखवतो म्हणून आडोशाला घेऊन गेलेल्या भीमराव कांबळे नावाच्या ६५ वर्षांच्या वृद्धाने तिच्यावर पाशवी बलात्कार केला आणि तिला ठार मारून तिचा देह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपविला. मुलगी बेपत्ता झाल्याचे लक्षात आल्यावर तिचा शोध सुरू झाला आणि ती सापडली नाही तेव्हा गावकरी व्यवस्थेच्या विरोधात संतापाने पेटून उठले. गावात असंतोष खदखदू लागला. ग्रामस्थांनी स्वतःच शोधमोहीम सुरू केली आणि तो भीमराव कांबळेदेखील गावकऱ्यांच्या शोधमोहिमेत सहभागी होऊन मुलीला शोधण्याचे नाटक करू लागला. आपणच गुन्हा केला आहे असा संशय येऊ नये म्हणून गर्दीत वावरताना तो लोकांना उलटसुलट माहिती देऊन व संशयास्पद उत्तरे देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत होता. आपला संशय येऊ नये म्हणून तो अत्यंत शांत आणि सामान्य राहून समाजाचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करत होता आणि त्यामुळेच संशयाची सुई त्याच्याकडे वळली. एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेजमुळे तो संशय पक्का झाला आणि भीमराव कांबळेचा मुखवटा उतरला. तोपर्यंत तो संवेदनशील समाजाचा एक भाग म्हणून वावरत होता. मुलीचा शोध घेणाऱ्या व्यवस्थेचा भाग म्हणून त्यामध्येही तो शहाजोगपणे सहभागी झाला होता. पण तोच आरोपी आहे हे स्पष्टपणे उघडकीस आले, तेव्हा तो व्यवस्थेच्या आणि समाजाच्या दुसऱ्या बाजूचा भाग झाला. व्यवस्था आणि समाज यांचे वेगळेपण हे असे असते. जेव्हा कोणतीही व्यक्ती समाजाचा भाग म्हणून वावरत असते, तेव्हा ती व्यवस्थेच्या विरोधात आवाज उंचावते, अन्यायाविरुद्ध दंड थोपटून समाजाच्या असंतोषाचा भाग बनते, पण तीच व्यक्ती जेव्हा समाजातून बाहेर पडून व्यवस्थेच्या खुर्चीवर बसते, तेव्हा समाजाच्या असंतोषाचे लक्ष्य बनते. म्हणजेच, ज्या व्यवस्थेच्या विरोधात समाज नेहमी पेटून उठतो, कोणत्याही अन्याय, अत्याचाराविरोधात व्यवस्थेस जाब विचारतो, ती व्यवस्था म्हणजे समाजाचीच दुसरी बाजू असते.

ज्याने कधीच पाप केले नाही त्यानेच व्यभिचारी महिलेस दगड मारावा असा निर्णय देऊन या व्यवस्थेला आरसा दाखविण्याचे काम हजारो वर्षांपूर्वीच्या त्या कथेतून केले गेले, म्हणून ती कथा आजही कालसुसंगत ठरते. आज समाजात व्यवस्थेविरुद्ध असंतोष उमटलेला दिसतो. त्या असंतोषाला वाचादेखील फुटते आहे. समाजातील भ्रष्ट लोकांनी बनावट बुरखे पांघरूण काही व्यवस्थांमध्ये शिरकाव केल्याची खंत व्यक्त करताना भारताच्या सरन्यायाधीशांनी केलेल्या एका कथित वादग्रस्त वक्तव्यानंतर संवेदनशील समाज असाच खवळून उठला. समाजमाध्यम नावाच्या मंचावर या संतापाचे तीव्र पडसाद उमटू लागले आहेत आणि व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविण्याचा हाकारादेखील सुरू झाला आहे. या सुरात सूर मिसळून समाजाने आता व्यवस्थेला धडा शिकविण्यासाठी हात उगारले आहेत. अशा वेळी बायबलमधील त्या कथेचा संदर्भ आठवतो आणि एक प्रश्न उभा राहतो, 'व्यवस्थेच्या विरोधात पेटून उठणाऱ्या समाजासमोर आरसा धरण्याची गरज निर्माण झाली आहे का?' ज्या व्यवस्थेच्या विरोधात समाज पेटून उठतो आहे, ती व्यवस्था समाजाच्या जीवनशैलीतूनच उभी राहिलेली असेल, तर व्यवस्थेच्या बिघडलेल्या घडीसाठी जबाबदार नेमके कोण असणार आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधणेदेखील गरजेचे आहे. गुन्हेगाराचा शोध घेणाऱ्या गर्दीत सहभागी झालेला कोणी स्वतःच गुन्हेगार असेल, तर तो व्यवस्थेला जाब कसा विचारू शकेल हा प्रश्नदेखील भीमराव कांबळेवरील गुन्ह्याच्या आरोपानंतर ठळकपणे अधोरेखित झाला आहे. पाप, पुण्य या कल्पना कालबाह्य होऊ लागल्या आहेत. त्याची चाडदेखील आता फारशी राहिलेली नाही. अन्यथा, येशू ख्रिस्ताने दिलेला निवाडा आजच्या समाजात दिला गेला, तर किती माना लाजेने खाली जातील आणि शिक्षा देण्याच्या आवेशाने उगारले गेलेले किती हात शरमेने खाली येऊन गर्दी घरोघरी जाईल, हा चिंतनाचा मुद्दा ठरेल.

व्यक्ती, कुटुंब, समाज आणि व्यवस्था यांचे चेहरे व मुखवटे यांतील फरक स्पष्ट करून दाखविणारे आरसे आसपास असतात. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर दगडफेक करू नये असा इशारा जेव्हा कोणीतरी अन्य कोणास देतो, तेव्हा तो आरसा दाखविण्याचा एक प्रयत्न असतो. हमाम में सब नंगे है, असाही दाखला काही प्रसंगी दिला जातो. त्यामुळे, व्यवस्था हा समाजाच्या आणि व्यक्ती, कुटुंबाचा भाग आहे, हे वेगळे सांगावे लागत नाही. अन्याय, अत्याचार, व्यभिचार, भ्रष्टाचार ही व्यवस्थेला लागलेली कीड आहे, म्हणजे ती समाजाला लागलेली कीड आहे आणि व्यक्ती, कुटुंब येथूनच त्याची सुरुवात झालेली आहे, हे उघड आहे. अन्यथा, व्यवस्थेला जाब विचारण्यासाठी सरसावणारे अनेक जण काचेच्या घरात राहतात, हे माहीत असूनही व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाचे नेतृत्व करावयास ते सर्वांत पुढे असले तरी त्याबद्दल फारशी तक्रार केली जात नाही. व्यवस्थेविरोधातील संघर्षात पहिला दगड कोणी मारावा हा मुद्दाच त्यामुळे कालबाह्य झाला आहे.


व्यक्ती, कुटुंब हा समाजाचाच घटक असतो, त्यामुळे तो व्यवस्थेचाच भाग असतो, त्यामुळे कुटुंब आणि व्यक्ती या व्यवस्थेलाही आता आरशात पाहावे लागेल, हे स्पष्ट आहे. अलिकडेच, सुमारे आठवडाभरापूर्वी, उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील एका गावात १८ वर्षांच्या एका नवविवाहितेने सासरच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. आपल्या जीवाला धोका आहे अशा शंकेने भयभीत झालेल्या या तरुणीने आत्महत्या करण्याच्या काही तास अगोदर असहायपणे आपल्या जन्मदात्यास फोन करून घरी घेऊन जाण्याची विनवणी केली होती, असे सांगण्यात येते. माहेराहून दहा लाख रुपये घेऊन येण्यासाठी तिच्यापाठी पतीने आणि सासरच्यांनी तगादा लावला होता आणि त्यामुळेच प्रचंड मानसिक तणावातून तिने पित्याला माहेरी घेऊन जाण्याचे साकडे घातले आणि अखेर एका अगतिक क्षणी असहायपणे आपले आयुष्य संपविले. हा हुंडाबळीचा प्रकार असल्याचा आरोप तिच्या माहेरच्या माणसांनी केला आहे. गेल्या फेब्रुवारीमध्ये या तरुणीचा विवाह झाला, तेव्हा तिच्या पित्याने भरपूर हुंडा दिला होता, पण आणखी पैसे आणण्यासाठी तिचा छळ होत होता. या भयाखाली वावरणाऱ्या त्या तरुणीने त्या दिवशी रडत आपल्या पित्याला गाऱ्हाणे घातले, पण तिचा जन्मदाता तिला माहेरी नेण्याकरिता येण्याआधीच तिने गळफास घेऊन आपले आयुष्य संपविले होते. अशाच घटनेची पुनरावृत्ती त्याच दरम्यान महाराष्ट्रात नागपूरमध्ये उघडकीस आली. १९ वर्षांच्या एका नवविवाहितेचा सासरच्या मंडळींकडून हुंड्यासाठी छळ सुरू होता, त्या सूडातूनच तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली आणि हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याचा कांगावा पोलिसांसमोर करण्यात आला. मृतदेहाच्या उत्तरीय तपासणीनंतर, तिच्या शरीरावरील झटापटीच्या खुणा आणि श्वास गुदमरल्यामुळे झालेल्या यातना यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे खरे कारण उघड झाले. उत्तर प्रदेशात ग्रेटर नोएडामध्ये जालपुरा गावात एका नवविवाहितेस हुंड्यासाठी छळ करून ठार मारल्यानंतर, घराच्या तिसऱ्या मजल्यावरील गच्चीतून पडून मृत्यू झाल्याचा कांगावा करणाऱ्या कुटुंबाचा कट पोलिसांनी उघडकीस आणला. व्यक्ती, कुटुंब, हा समाजाचा, पर्यायाने व्यवस्थेचाच एक घटक असल्याने अशा घटना व्यवस्थेच्या शुद्धतेवरही प्रश्नचिन्हे उमटवणार हे स्पष्ट आहे. त्याच दरम्यान, उत्तर प्रदेशात अलिगड येथे घडलेली एक घटनादेखील व्यक्ती, समाज आणि व्यवस्था यांच्यासमोर आरसा धरणारी ठरली आहे. आपल्या मुलीस प्रियकरासोबत बोलत असताना पाहून चिडलेल्या पित्याने तिला बांधले आणि अर्धवट बेशुद्धावस्थेत असलेल्या आपल्या मुलीला मोटारसायकलवर टाकून बाजूच्या शेतात नेऊन तिची हत्या केली. तिचा मृतदेह तेथेच पुरला. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलगी बेपत्ता झाल्याचा कांगावा करत शोधमोहिमेत सहभागी झाला. महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील नसरापुरात साडेतीन वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या व मृतदेहाची शेणाच्या ढिगाऱ्याखाली विल्हेवाट लावून गुन्हा लपवत व्यवस्थेस जाब विचारण्यासाठी गर्दीत सहभागी झालेल्या भीमराव कांबळेनेदेखील असेच केले होते.

वाराणसी येथील सरकारी निवारागृहात मे महिन्याच्या सुरुवातीस आत्महत्या करून आपले आयुष्य संपविणाऱ्या या कोवळ्या मुलीची कहाणी करुण आणि माणुसकी, व्यवस्था, व्यक्ती, समाज, कुटुंब या सर्वांवर प्रश्नचिन्हे उमटविणारी आहे. जौनपूरच्या एका भाजी विक्रेत्याच्या कुटुंबातील ही सर्वांत लहान मुलगी. आईच्या अकाली निधनानंतर पित्याच्या कमाईवरच पोट भरणाऱ्या या कुटुंबातील अन्याय आणि ओढगस्तीमुळे तणावाखाली असलेली ही जेमतेम १२ वर्षांची मुलगी एका क्षणी मित्राचा हात धरून घरातून पळून गेली. नातेवाईकांनी तिचा शोध घेऊन तिला घरी आणले, पण ती अस्वस्थ होती. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये तिने भावासोबत जौनपूरचे पोलिस ठाणे गाठले आणि कौटुंबिक लैंगिक हिंसाचाराचे एक अस्वस्थ करणारे प्रकरण उघडकीस आले. मारून टाकण्याच्या धमक्या देत या कोवळ्या मुलीवर वर्षभर लैंगिक अत्याचार करणाऱ्या तिच्या बापानेच त्याच्या दुसऱ्या मुलीलाही आपल्या वासनेची शिकार केले होते. त्यानंतर त्या मुलीचा मृत्यू झाला आणि घाबरलेल्या या पीडित मुलीने पोलिसांना साकडे घातले. अत्याचारी बापास अटक होऊन शिक्षा झाली आणि पीडित मुलीस वाराणसीच्या सरकारी निवारा केंद्रात दाखल करण्यात आले. जबर मानसिक आघाताखाली असलेल्या या मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर निवारा केंद्रातून बाहेर पडावे लागेल आणि बाहेरच्या जगात आपल्या जवळचे कोणीच नसल्याने येथून बाहेर पडल्यानंतर आपण समाजात सुरक्षित राहणार नाही, या भीतीने तिने निवारा केंद्रातच आत्महत्या केली. वाढत्या वयाची समज येण्याआधीच खडतर संघर्ष करत जगण्याच्या भयाने जीवन संपविणाऱ्या या मुलीने एका भीषण सामाजिक वास्तवाचे रूप दाखवून दिले आहे. तिची कहाणी पचविणे समाजासाठी सोपे नाही. लैंगिक अत्याचाराची शिकार होणाऱ्या बालकांच्या मानसिक स्थितीचे एक अस्वस्थ चित्र तिच्या कहाणीतून उमटले आहे आणि त्यातून समाज व व्यवस्थेस काही प्रश्नदेखील विचारले गेले आहेत. अनेकदा, अशा अत्याचाराविरोधात बळी पडणाऱ्यांना गप्प राहण्याचे सल्ले समाजातून किंवा कुटुंबाकडून दिले जातात. समाजात तोंड दाखवायला जागा राहणार नाही, समाज कोणत्या नजरेने पाहील, अशी भीती जेव्हा पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबांना सतावते, तेव्हा प्रश्नचिन्हांचा रोख साहजिकच, समाजाकडेही वळलेला असतो. अशा असंख्य पीडिता तोंड दाबून समाजात वावरत असतात. त्यामुळे, व्यवस्थेला प्रश्न विचारण्यासाठी सरसावलेल्या समाजातून, पहिला दगड मारण्यासाठी कोण पुढे येणार हा प्रश्न विचारण्याचीही गरज आता निर्माण झाली आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### सुरक्षित भविष्यासाठी जन आक्रोश




जन आक्रोश ही संस्था गेल्या १४ वर्षांपासून महिन्यातील दर बुधवारी नागपुरातील चौकांमध्ये एक तास सिग्नलसवर वाहनचालकांशी संवाद साधून वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी विनंती करते. मागील सहा महिन्यांपासून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याकरिता दर शनिवारी सुद्धा चौकात प्रबोधन सुरू केले आहे. संस्थेचे सगळे सदस्य सातत्याने निःस्वार्थपणे काम करत आहेत. सोबतच इतर दिवशी शाळा, महाविद्यालये, ट्युशन क्लासेस, आयटीआय, पोलिस ट्रेनिंग स्कूल, होमगार्ड, नर्सिंग कॉलेज व अन्य ठिकाणी ५० मिनिटांचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे वाहतूक नियमांचे महत्त्व व ते न पाळल्यास त्यामुळे होणाऱ्या परिणामांची माहिती देण्यात येते. नागरिकांच्या या प्रबोधनातून दररोज होणारे रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उन्हाळी संस्कार शिबिरांमध्ये 'जन आक्रोश फॉर बेटर टुमारो' या संस्थेमार्फत सामाजिक बांधिलकी या नात्याने वाहतूक नियम आणि शिस्तीबद्दल शिबिरार्थींना प्रबोधन करण्यात आले.

वाहतुकीचे नियम सगळ्याच वाहनचालकांना नक्कीच माहीत आहेत. तरुणाईच नाही तर सर्व वयोगटातील वाहनचालक नियम तोडताना आपण पाहतो. म्हणून बालसंस्कार वर्गात प्रबोधन करून मुलांच्या पालकांपर्यंत पोहोचून वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, हा संदेश पोहोचवण्यासाठी हा उपक्रम सुरू केला आहे. मराठीत म्हण आहे 'कळते पण वळत नाही.' तेव्हा निःशुल्क शिबिराचा लाभ घ्यावा व होणारे अपघात टाळण्यास मदत करावी. तसेच नागपूरमध्ये शौर्य शिबिर, क्रिकेट कोचिंग, उन्हाळी ट्युशन क्लासेस यांनी सुद्धा जन आक्रोश या संस्थेच्या माध्यमातून लहान वयापासून वाहतूक नियम पालनाचे धडे गिरवावे. यामुळे रस्ते अपघात कमी होतील असा विश्वास आहे. काही दिवसांपूर्वी नागपुरातील जयताळा येथील मंगलमूर्ती चौकात जनप्रबोधन करण्यात आले. या उपक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. जन आक्रोश संस्थेशी जुळण्यासाठी खालील नंबरवर संपर्क साधता येईल.

**रवींद्र कासखेडीकर**/९४२२१०५९११

### अशी पाखरे येती...

भल्या पहाटे प्रसन्न सूर्यकिरणांनी जाग येताच खिडकीत यावी चिऊताई... किती रम्य कल्पना आहे! सर्वांत जास्त समोर येणारा हा सर्वज्ञात पक्षी म्हणून हा उल्लेख? चिऊताई थेट घरात येते आणि पहाटे नैसर्गिक अलार्म लावून चिवचिवाट करते, ही दिवसाची सकाळची सुरुवात किती रम्य. किती गोड! यासाठी चिमणी असावी, दिसावी, चिमणी यावी आणि बागडावी अंगणी यासाठी चिमणी वाचावी! पक्ष्यांना निसर्गाने दिलेले ते पंख, त्यांचे आकाशात उडणे, मंजुळ कूजन, झाडावर नक्षीदार घरटी बनवणे इत्यादी कारणांनी पक्षी हे समस्त जीवसृष्टीत वेगळे ठरतात. पक्षी अनेक आहेत, त्यांचे नानाविध प्रकार आहेत. पण अशा किती पक्ष्यांची आपल्याला माहिती असते? अंदाजे १०-२० पक्ष्यांची नावे कुणीही सांगू शकेल, पण माझ्या नुकतेच वाचनात आलेल्या निशिकान्त ना. मायी लिखित 'अशी पाखरे येती' या पुस्तकात टिटवीपासून रामगंगापर्यंत तब्बल १०१ पक्ष्यांची माहिती समाविष्ट असल्याचे लक्षात आले. खरंच हे निसर्गनिर्मित पक्षिविश्व विलक्षण आहे. पक्षी माणसाला फार हानिकारक नसतात; माणूस मात्र त्यामानाने पक्ष्यांसाठी जास्त हानिकारक असतो. पूर्वीपासून जाळे, शिकार, पिंजरा आणि आपल्या जेवणाच्या थाळीत समावेश करणे यामार्गे बुद्धिमान माणूस पक्ष्यांचा दुनियेसाठी जास्त धोकादायक गणला जावा, हे किती भयावह आहे? याउलट कुणी पक्षिप्रेमी उन्हाळ्यात जलपात्र मोहीम सुरू करतात. कुणी दाणे टाकतात, ही त्यातल्या त्यात मोठी समाधानाची बाब आहे. पक्षी विहार करतात तरी एकोप्याने राहतात. पक्षी कधीही उपासमारीने मरत नाहीत; प्रसंगी ते ऋतुमानानुसार स्थलांतर करताना आढळतात. आकाशात शिस्तीत उडणारा पक्ष्यांचा थवा बघून तणावाचा निचरा होतो. पक्ष्यांची घरटी हा एक वेगळाच संशोधनाचा विषय निशिकान्त मायी यावेळी उद्धृत केला आहे. प्रत्येक पक्षी त्यांची वैशिष्ट्यपूर्ण घरटी कशी तयार करतात. इतर पक्ष्यांची घरटी बघून त्यांना काही बदल करण्याची इच्छा होत नसावी काय? पण अनुकरण करत बदल करणे हा मानवी स्वभाव असून पक्षी कधीच निसर्गाच्या विरोधात जात नाहीत, हे उल्लेखनीय. पक्ष्यांचा मृत्यू आकाशात विहार करताना नैसर्गिक पद्धतीने होतो. पक्षी कधीच घरट्यात मरून पडलेला आढळत नाही. शिकार आणि विजेच्या तारांमध्ये अडकून वगैरे अनैसर्गिक मृत्यू वगळता पक्ष्यांचा मृतदेह सापडत नाही. पक्षी अडकतात विजेच्या तारांमध्ये. कधी नायलॉन मांजामध्ये, कधी मोबाईल इंटरनेटच्या अदृश्य जाळ्यांत आणि हा दुष्ट माणूस त्यांना जमिनीवर लोळवतो. असं म्हणतात पक्षी घरट्यात कधी मरून पडत नाही. याअर्थी ते उत्तुंग आकाशाला मिठी मारतानाच कधीतरी आकाशाशी एकरूप होत असावे काय? अशा निसर्गदूतांना जर कुणी निसर्गशत्रू पिंजऱ्यात बंदिस्त करीत असतील, कुणी विक्री तर कुणी चक्क शिकार करीत असतील तर बुद्धिशाली माणसाने हा स्वभाव बदलणे गरजेचे आहे. झाडांची कत्तल करून बहुमोल निसर्गाशी प्रतारणा करून धूर्त मानव निसर्गाचा समतोल बिघडवत आहे. परिणामी निसर्गात अनेक बदल घडत आहेत. यावर मूकपणे पक्षी त्यांच्या परीने उपाययोजना करून निसर्गाच्या कार्याला हातभार लावत आहेत. हे पक्ष्यांचे मानवावर किती मोठे उपकार! विद्यार्थ्यांनाही उपयोगी पडू शकणारी पक्ष्यांची माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल निशिकान्त मायी यांचे अभिनंदन करायलाच हवे.

**मो. बा. देशपांडे**/८३२९१९३५४२

### मनाची विश्रांती

दैनंदिन ताणतणाव कमी करण्यासाठी आणि जेवणाचा आनंद घेण्यासाठी एखादी आवडती मालिका लावणे, काहीतरी हलकं-फुलकं आणि रिलॅक्स करणारं चित्रण बघणं कुणाला आवडणार नाही? अनेक कुटुंबांमध्ये एक नियम म्हणजे जेवण करताना टीव्हीवर आवडती मालिका लावणे. हे एक व्यसन नाही तर व्यासंग म्हणावा लागेल. यामागे एक सोपी आणि खूप महत्त्वाची सायकोलॉजी लपलेली आहे. वारंवार बघण्यासाठी आवड असणाऱ्या मालिकांना मानसशास्त्रात 'कम्फर्ट व्ह्यूइंग' किंवा 'पॅरासोशल रिलेशनशिप' म्हणतात. नॉस्टॅल्जिया आणि बंध यात समाविष्ट होतो. अनेक मालिकांमध्ये आदर्श समाजाचे उदाहरण असल्याचे दिसून येते. वाटते की, हे 'आपलेच' लोक आहेत. वारंवार पाहिल्याने या पात्रांशी एक भावनिक बंध निर्माण होतो. जुने एपिसोड्स पाहिल्याने 'नॉस्टॅल्जिया' वाढतो आणि एक सकारात्मक भावना मिळते. सुसंगतीची गरज आणि करुणेचा भाव या मालिकेची पद्धत कधी बदलत नाही. प्रत्येक एपिसोडमध्ये एखादी काल्पनिक नाही तर वस्तुस्थितीशी निगडित अशी समस्या येते; ती सोडविली जाते आणि शेवटी सर्व काही ठीक होते. एक सकारात्मक संदेश दिला जातो. प्राधान्याने हीच सुसंगती प्रेक्षकांना आवडते आणि जीवनातील अनिश्चिततेमध्ये एक मानसिक आधार देते. तुम्ही तीच मालिका पुन्हा पाहता, जेव्हा तुम्हाला कथा माहीत असते. त्यामुळे मेंदूला नवीन माहितीवर प्रक्रिया करावी लागत नाही. यामुळे मनाला खूप सुरक्षित आणि आरामदायी वाटते. जेवताना किंवा तणावात असताना मेंदूला विश्रांती हवी असते आणि आपल्या आवडीची मालिका नेमकी तीच विश्रांती अनुभवायला भाग पाडते. ती आपल्याला एका सुरक्षित जगात नेते, जिथे तुम्हाला कथेबद्दल विचार न करता फक्त मनोरंजनाचा आनंद घेता येतो. तेव्हा लक्षात ठेवा की, जेवताना टीव्हीवर मालिका पाहताना केवळ तुमची आवड नाही, तर तुमच्या संगोपनाची, मनोरंजनाची अन् मनाच्या विश्रांतीची नैसर्गिक गरज म्हणून पाहतो आहोत; जिचा उद्देश केवळ आनंद आणि आनंदच असतो.

**धनश्री विवेक ठाकरे**/पुणे, ७५१७७९९०५७

### टोपल्या घ्या... परड्या घ्या...!

कुणाचं आयुष्य कसं सरेल हे नियतीच्या न्यायावर अवलंबून असलं, तरी बऱ्याच वेळा नियतीचा न्याय का कोणास ठावूक उफराटाच वाटतो. बालपणीचे वय कसे निघून जाते ते कळतही नाही. ही दुनिया फार वेगळी असते; मात्र त्या वयातली काही समज मोठ्यांनाही चक्रावून टाकणारी असते. मी १०-१२ वर्षांचा असताना आमच्या गल्लीत डोक्यावर एकमेकांवर ठेवलेल्या टोपल्या आणि बगलेत एक गाठोडं घेऊन एक बाई नियमितपणे यायची. तिच्याबरोबर परकर-पोलक्यात आठ-नऊ वर्षांची चुणचुणीत मुलगी असायची. तिचा एक हात आईच्या हाताला धरलेला आणि दुसरा डोक्यावर असलेल्या टोपल्यांना धरलेला असायचा. गल्लीत आल्याबरोबर ती 'डालकं घ्याऽ टोपल्या घ्याऽऽ परड्या घ्याऽऽऽ' असे अतिशय गोड आवाजात म्हणायची. ती आमच्या ओट्यावर बसायची. डोक्यावरच्या टोपल्या बाजूला ठेवून गाठोडेही एका बाजूला ठेवायची. शेजारी ती मुलगीही बसायची. काही टोपल्यांची आणि एक-दोन परड्यांची विक्री व्हायची. धान्य ठेवण्यासाठी मोठमोठ्या कोठ्याही आम्ही बनवतो, असे म्हणायची. या कोठ्यांचा फायदा म्हणजे धान्याला हवाही लागते अन् खराबही होत नाही. एका बाबतीत ती फार भाग्यवान होती. तिच्या नवऱ्याच्या हातात रंगीबेरंगी चटया तयार करण्याची कला होती. मोठमोठ्या बैठक खोलींसाठी खूप छान चटया तयार करण्याचे कौशल्य तिच्या नवऱ्याच्या हातात होते. येणाऱ्या बायका काही वेळेला हाताने दाखवून अशी टोपली हवी, असे सांगायच्या तेव्हा ती तिथल्या तिथे गाठोड्यातून बांबूच्या काड्या काढून टोपली विणायला सुरुवात करायची. तिच्या हातांची बोटे इतक्या वेगाने चालायची की, पाहणारा अवाक् होऊन जायचा. इतकंच काय, कोणी परडी सांगितली की ती छोटीशी चिमुरडी तिथल्या तिथेच परडी करायला सुरुवात करायची. तिच्या हातांची बोटेही अतिशय वेगाने काम करायची. तिचा नवरा बांबू दोन-तीन दिवस ओले करून ते तासून छान काड्या काढायचा. एके दिवशी ती मुलीला घेऊन रिकाम्या हातांनी आली. गुजरातमधल्या एका व्यापाऱ्याने चांगल्या भावाने चटया तसेच टोपल्या खरेदी करण्याचे आश्वासन दिल्याने आम्ही आठ दिवसांनी तिकडे जाणार आहोत, असे तिने सांगितले.

सहा दिवसांनी दोघे नवरा-बायको मुलीसह आमच्या घरी आले. तिच्या डोक्यावर खूप वेगळ्या आकाराच्या सुंदर दोन टोपल्या अन् मुलीच्या डोक्यावर झाकण असलेल्या दोन सुरेख परड्या होत्या. आईने त्यांना बैठकीत बोलाविले. 'दोन टोपल्या आणि परड्या तुम्हाला भेट म्हणून आणल्या आहेत' असे तिने आईला सांगितले. टोपल्या आणि परड्या आईच्या हातात दिल्या. आईनेही त्यांच्यासाठी आधीच देण्याच्या वस्तू आणल्या होत्या. त्यांना खायला नाश्ता दिला. आता मात्र या गोष्टीला दीर्घ कालावधी उलटला. काळ पुढे सरकत गेला. आजही मला पाठमोरी डोक्यावर टोपल्या घेतलेली ती, तिच्या हाताला धरून चालणारी चुणचुणीत चिमुरडी डोळ्यांसमोर दिसते अन् डोळे नकळत पाणावतात.

**उज्ज्वल कुळकर्णी**/पुणे, ९४२२२८८०६२

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य की स्वैराचार?

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेकडे आदराने पाहिले जाते. प्रश्न विचारणे, सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणे आणि जनतेचा आवाज बुलंद करणे हे पत्रकारितेचे परम कर्तव्य आहे. परंतु, नॉर्वेच्या एका महिला पत्रकाराने देशाच्या सन्माननीय पंतप्रधानांच्या बाबतीत जे वर्तन केले, त्याने पत्रकारितेच्या या पवित्र कर्तव्याला काळिमा फासला आहे. तो प्रकार केवळ निंदनीय नसून पत्रकारितेच्या नावाखाली सुरू असलेल्या मानसिक दिवाळखोरीचे आणि स्वैराचाराचे जिवंत उदाहरण आहे. पंतप्रधान हे केवळ एका पक्षाचे नसतात. ते संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करीत असतात. त्या पदाला एक प्रतिष्ठा असते, जागतिक सन्मान असतो. प्रश्न धारदार, कटू किंवा आक्रमक असू शकतात; लोकशाहीत त्याला पूर्ण मुभा आहे. पण प्रश्नांची धार आणि भाषेची घसरलेली पातळी या दोन्हीमध्ये गल्लत होऊ नये. या पत्रकार परिषदेत जे काही घडले, तो पत्रकारितेचा भाग नव्हता, तर तो निव्वळ प्रसिद्धिलोलुपतेचा आणि उद्दामपणाचा कळस होता. पत्रकारितेत तथ्य आणि मर्यादा या दोन गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करताना या मर्यादांचे भान अधिक प्रगल्भ असावे लागते. परंतु, या महिला पत्रकाराने सर्व नियम, शिष्टाचार आणि सुसंस्कृतपणा धाब्यावर बसवला. आजकाल जागतिक पातळीवर 'माईक' हातात आला की स्वतःला कायद्यापेक्षा आणि नैतिकतेपेक्षा श्रेष्ठ समजण्याची घातक प्रवृत्ती काहींमध्ये बळावत आहे. हा प्रकार याच प्रवृत्तीचे हिडीस प्रदर्शन होते. केवळ टीआरपी आणि सोशल मीडियावरील काही लाईक्ससाठी देशाच्या पंतप्रधानांचा जाहीर अपमान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा विकृत मानसिकतेचा तीव्र शब्दात निषेध व्हायलाच हवा. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ काहीही बोलण्याचा आणि कसाही वागण्याचा परवाना असा अजिबात होत नाही. स्वातंत्र्य हे जबाबदारीसोबत येते. नॉर्वेच्या त्या महिला पत्रकाराने केलेल्या अभद्र व्यवहारामुळे केवळ तिचीच नव्हे, तर तिच्या देशाच्या सुसंस्कृतपणावरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अशा उद्धट पत्रकारांवर केवळ तात्पुरती बंदी घालून भागणार नाही; त्यांना नैतिकतेचे आणि शिष्टाचाराचे धडे देणे गरजेचे आहे. पंतप्रधानांनी अत्यंत संयमाने आणि परिपक्वतेने या परिस्थितीला हाताळले, हे त्यांच्या पदाला साजेसे होते. मात्र, म्हणून समोरच्याचा उद्दामपणा खपवून घेतला जाऊ शकत नाही. टीका जरूर व्हावी, पण ती वैचारिक पातळीवर असावी, वैयक्तिक चिखलफेक आणि अभद्रतेच्या पातळीवर नाही. हीच सुदृढ लोकशाहीची ओळख आहे, असे मला वाटते.

**श्याम कोळी**/८३८००८०९५०

### 'झुरळांच्या उद्रेकाचे अर्थ' परखड अग्रलेख

दि. २३ मे च्या अंकातील 'झुरळांच्या उद्रेकाचे अर्थ' हे संपादकीय अत्यंत परखड विचार मांडणारे वाटले. परखड मते मांडण्याच्या परंपरेला जागून तरुण भारतने झुरळ जनता पार्टीच्या निर्मितीच्या पृष्ठभूमीचे विश्लेषण केले आहे. अशीच निरुपद्रवी वाटणारी आंदोलने नंतर जनआंदोलने कशी झाली ते आम आदमी पार्टी तसेच नवनिर्माण आंदोलन यासारखे दाखले देऊन संबंधितांना सावध करण्याचा प्रयत्न अग्रलेखात केला आहे. फरक इतकाच, की ती आंदोलने ज्या सरकारच्या विरोधात झाली, त्यांच्या तुलनेत सध्याचे सरकार अधिक कणखर आणि लवचीक आहे. शेतकरी आंदोलनाचा धोका पाहून, संसदेत मान्य झालेले कायदे मागे घेण्याची लवचीकता किंवा प्रचंड बहुमत असूनही सीएएची अंमलबजावणी किंवा राम मंदिर स्थापनेसाठी योग्य वेळ येण्याची वाट बघण्याचा संयम या सरकारने दाखवला आहे. त्यामुळे झुरळ पार्टीचा प्रभाव वाढताना (बंदी वगैरे घालून) पेस्ट कंट्रोल करून स्वच्छता करण्याबरोबरच कायम स्वरूपाच्या स्वच्छतेचा (म्हणजे भ्रष्टाचार, बेरोजगारी, कायदा व सुव्यवस्था वगैरे जेन-झीला भडकवू शकणारे प्रश्न योग्य प्रकारे हाताळण्याचा) सल्लाही संपादकीयात दिला आहे. एकूणच या पार्टीला झुरळ म्हणून झटकून न टाकता भविष्यातील धोका ओळखून पवित्रा घेण्याचा निर्भीड सल्ला या अग्रलेखात दिला आहे. त्याबद्दल अभिनंदन.

**जयंत जेस्ते**/पुणे. ९८२२५१०३४९

### सात्त्विक आहाराचे विज्ञान आणि आधुनिक जीवनातील उपयुक्तता!

आजच्या आधुनिक युगात मनुष्याचे जीवन वेगवान झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे माणसाच्या जीवनशैलीत मोठे बदल घडून आले आहेत. व्यस्त दिनचर्या, ताणतणाव, अपुरी झोप, फास्ट फूडचे वाढते प्रमाण आणि शारीरिक



हालचालींचा अभाव यामुळे अनेक शारीरिक व मानसिक समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत निरोगी आणि संतुलित जीवनशैलीचा शोध घेणे ही काळाची गरज बनली आहे. या संदर्भात सात्त्विक आहार ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. सात्त्विक आहार हा केवळ पोट भरण्यासाठी घेतला जाणारा अन्नप्रकार नसून तो शरीर, मन आणि आत्म्याच्या संतुलनाचा पाया मानला जातो. भारतीय योगशास्त्र आणि आयुर्वेदात सात्त्विक आहाराला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

'सत्त्व' या शब्दाचा अर्थ शुद्धता, शांतता, संतुलन आणि सकारात्मकता असा होतो. मनाला प्रसन्न ठेवणारे, शरीराला आवश्यक पोषण देणारे आणि मानसिक स्थैर्य वाढवणारे अन्न म्हणजे सात्त्विक आहार होय. ताजी फळे, हिरव्या भाज्या, अंकुरित धान्ये, कडधान्ये, दूध, तूप, सुकामेवा, मध आणि नैसर्गिक अन्नपदार्थ हे सात्त्विक आहाराचे मुख्य घटक आहेत. या आहारात अति मसालेदार, तेलकट, प्रक्रिया केलेले किंवा कृत्रिम घटक असलेले पदार्थ टाळले जातात.

सात्त्विक आहाराचे विज्ञान समजून घेतले तर त्यामागील तत्त्वे अत्यंत प्रभावी आणि व्यावहारिक असल्याचे दिसून येते. आधुनिक विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की आपण घेत असलेल्या अन्नाचा थेट परिणाम आपल्या शरीरावर तसेच मानसिक आरोग्यावर होत असतो. आपल्या शरीरातील ऊर्जा, रोगप्रतिकारकशक्ती, हार्मोन्सचे संतुलन आणि मेंदूची कार्यक्षमता यावर आहाराचा मोठा प्रभाव असतो. सात्त्विक आहारामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने, तंतुमय पदार्थ आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. ताज्या फळांमध्ये आणि भाज्यांमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक कमी करण्यास मदत करतात.

विद्यार्थ्यांसाठी सात्त्विक आहार विशेष उपयुक्त आहे. योग्य आहारामुळे स्मरणशक्ती वाढते, एकाग्रता सुधारते आणि मानसिक तणाव कमी होतो. सात्त्विक आहार म्हणजे केवळ विशिष्ट पदार्थांचे सेवन नव्हे; तर एक जीवनशैली आहे. योग्य वेळेवर भोजन करणे, अति खाणे टाळणे, शांत वातावरणात अन्न सेवन करणे आणि कृतज्ञतेच्या भावनेने भोजन करणे ही देखील त्याची तत्त्वे आहेत.

शेवटी असे म्हणता येईल की सात्त्विक आहार हा प्राचीन भारतीय ज्ञानाचा अमूल्य वारसा आहे. आधुनिक विज्ञानानेही त्यातील अनेक तत्त्वांना मान्यता दिली आहे. निरोगी शरीर, शांत मन आणि संतुलित जीवनासाठी सात्त्विक आहाराचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. कारण योग्य आहार हीच निरामय जीवनाची खरी गुरुकिल्ली आहे.

**कुमार व्यंकटेश नेरकर**/७६२०६८७३०३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शेतकरी ग्राहकांना पेट्रोल व डिझेल पुरवठा करा : अनिल बोर्डे

गेवराई (प्रतिनिधी) सद्यस्थितीत शेतकरी ग्राहकांना पावसाळा जवळ आल्यामुळे शेतीची कामे युद्ध पातळीवर मशागत करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे त्यासाठी पेट्रोल व डिझेलची अत्यंत आवश्यकता असते. सदरील वर्षभराची कामे पावसापूर्वी करणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी आवश्यक डिझेल व पेट्रोलचा पुरवठा शासनाने व पेट्रोल पंपधारकांनी प्राधान्याने शेतकरी ग्राहकांना पुरवठा करावा म्हणजे कायदा पेट्रोल वसुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता शासनाने व पेट्रोल पंप मालकाने घेणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या शेतामध्ये रोटर, नांगरणे आधी कामासाठी पेट्रोल व डिझेलचे अत्यंत आवश्यकता असते. तरी शासनाने अग्रक्रम देऊन पेट्रोल व डिझेलचा पुरवठा करण्यात यावा. ग्रामीण भागातील काही पेट्रोल पंपावर डिझेल व पेट्रोलचा पुरवठा होत नसल्यामुळे शेतकरी ग्राहकांना मानसिक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. शेतीची कामे या कालावधीत नाही झाली तर त्याचा आर्थिक ताण शेतकऱ्याला बसू शकतो. तरी शासनाने ग्रामीण भागातील पेट्रोल पंपावर डिझेलचा पुरवठा नियमितपणे सुरू राहील याची दक्षता घ्यावी. व शेतकरी ग्राहकांना सुरळीतपणे पेट्रोल व डिझेल मिळेल याबद्दल शासनाने योग्य त्या सूचना पेट्रोल पंप मालक यांना देणे आवश्यक आहे. शासनाने पेट्रोल व डिझेलचा पुरवठा अग्रक्रमाने शेतकरी ग्राहकांना करावा आशिष शासनाचे आदेश आहेत तरी पेट्रोल पंपावर डिझेल व पेट्रोलचा पुरवठा नियमितपणे राहील याची खबरदारी शासनाने घ्यावी अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राची उपाध्यक्ष व गेवराई ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे यांनी या प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलेली आहे.

# रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या कार्याचे प्रांतपाल यांचेकडून कौतुक; सामाजिक बांधिलकी जोपासत पुरस्कार वितरण



अंबाजोगाई : येथील रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या पदाधिकारी व सदस्य यांची रोटरी प्रांतपाल रो.सुधीर लातुरे (डिस्ट्रिक्ट ३१३२) यांनी भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला आणि युवतींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अशी माहिती रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी दिली आहे.

शहरातील टि.बी.गिरवलकर अभियांत्रिकी महाविद्यालय येथे गुरूवार, दि. २१ मे २०२६ रोजी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईस रोटरी प्रांतपाल यांची अधिकृत भेट व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून रो.सुधीर लातुरे (प्रांतपाल ३१३२), फर्स्ट लेडी रो.सौ.संगीता लातुरे, रो.डॉ. गिरीश कुलकर्णी (उपप्रांतपाल), डॉ.तापडिया, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे आणि मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण व प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यासाठी सौ.आरती शिंदे व माजी नगरसेवक सौ.संगीता व्यवहारे यांची ही प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाचे हे पहिले वर्ष होते. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई कडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक करताना रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे यांनी सांगितले की, रोटरीच्या माध्यमातून अंबाजोगाई पंचक्रोशीत वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य केले जाईल. समाजाच्या उपयोगी पडेल असे कार्य रोटरीच्या माध्यमातून आम्ही करीत राहू. जिथे कमी तिथे आम्ही ही भावना जोपासून आम्ही कार्य करू व अंबाजोगाईचा सामाजिक वसा व वारसा आम्ही समर्थपणे पुढे घेऊन जाऊत असा विश्वास या कार्यक्रमाच्या माध्यमातून मी सर्वांना देतो. यावर्षी दिलेले पुरस्कार हे फक्त या वर्षापुरतेच मर्यादित न ठेवता प्रांतपाल रो.सुधीर लातुरे यांची आठवण म्हणून दरवर्षी एक दिव्यांग क्षेत्रात तर एक उद्योग क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना देण्यात येईल असे रो.शिंदे यांनी सांगितले. तर यावेळी बोलताना रो.डॉ.गिरीश कुलकर्णी (उपप्रांतपाल) म्हणाले की, भीमाशंकर शिंदे यांना सामाजिक कार्याची आवड आहे. या नव्या क्लबच्या माध्यमातून रोटरीची नवीन लीडरशिप व आयडिया निर्माण होणार असा विश्वास व्यक्त करून नव्या क्लबच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व भीमाशंकर शिंदे आणि त्यांचे सर्व सहकारी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई या नव्या क्लबचे कामही अतिशय उत्तम रितीने करतील असा विश्वास डॉ.कुलकर्णी यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप करताना रो.सुधीर लातुरे (प्रांतपाल ३१३२) यांनी सांगितले की, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई ही संघटना अवघ्या ८ महिन्यांची असूनही ती अंबाजोगाई शहरातील गरज असलेल्या ठिकाणी पोहचली आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. समाजातील योग्य व्यक्तींपर्यंत पोहचणारी संघटना म्हणून ही नवीन रोटरी नांवारूपाला येत आहे. अवघ्या ८ महिन्यांच्या कालावधी मध्ये रोटरी डिस्ट्रिक्ट मधून आलेल्या सूचनांचे पालन करून त्या पूर्ण करणे ही बाब खरच क्लबच्या भविष्याच्या दृष्टीने एक चांगले पाऊल या क्लबने टाकले आहे. हा क्लब येणाऱ्या काळात डिस्ट्रिक्ट मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करेल हा विश्वास मला आहे.

माझ्या शुभेच्छा व माझे सर्वोतोपरी सहकार्य या क्लबला राहील असे रो.लातुरे म्हणाले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते रोटरी पुरस्कार ईशा जोशी यांना रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार, दिपाली जाधव व रमेश सोमवंशी या दांपत्याला रोटरी सक्षम पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, फेटा, पुष्पगुच्छ असे होते. तर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी रोटरी मित्र स्वर्गवासी संजय गिरी यांच्या पत्नी श्रीमती अर्चना यांना त्यांचा उदरनिर्वाहासाठी पिको फॉल मशीन देऊन रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई त्यांना पुढील अडीअडचणींत पण क्लब आपल्या सोबत राहील असा विश्वास देवून सामाजिक बांधिलकी जोपासली. प्रारंभी रोटरीचे संस्थापक रो.पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्ज्वलाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तौर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला सर्व रोटरीयन श्री.आनंद कर्नावट, पुरूषोत्तम रांदड, जगदीश जाजू, ॲड.प्रवीण बजाज, वाजेद भाई, कृष्णा चव्हाण, विश्वनाथ लहाने, ॲड.कल्याण लोमटे, अविनाश मुके, कलीम शेख, श्रीनिवास पवार, वि.वा. गंगणे, भागवत कांबळे, सोनाली कर्नावट, मनोरमा सिरसाट आदींसह अंबाजोगाई शहरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विधी, वैद्यकीय, पत्रकारिता, संगीत, सहकार, व्यापार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई यांचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# स्वराज्याच्या राजमाता जिजाऊ मासाहेब नगराचे नामांकन उद्घाटन सोहळा संपन्न



बीड शहरातील बार्शी रोडवरील मुक्ताई चौक रेणू हॉस्पिटल समोर, स्वराज्याच्या राजमाता जिजाऊ मासाहेब नगराचे नामांकन उद्घाटन सोहळा जिल्हा भाजपा उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ नेतेनवनाथ अण्णा शिराळे यांच्या हस्ते शुभारंभ करून झाला.

यावेळी भाजपा नगरसेवक गोविंद भैया शिराळे, राष्ट्रवादीचे युवा नेते झुंजार शेठ धांडे, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत, काकडे साहेब, नाईकवाडे साहेब, विराज मेडिकलचे सतीश पैठणे,ईश्वर राऊत, मुन्ना नाईक, अमोल जाधव, पोखरीचे गणेश भोंगाने, घाडगे गॅरेज, दादासाहेब नाईक ,विशाल राऊत, बिडवे,राजू घाडगे, बप्पा धांडे, नागोराव काकडे, कोर्ट बेलीफ काकडे साहेब, दीपक पिंगळे, दीपक कदम, विक्रम काळे, गोविंद टाकळकर, शिवालय मेडिकल अनंता गुंडेकर , परमेश्वर शिराळे, किशोर शेरकर , डॉक्टर काळे, प्रवीण चव्हाण, कृष्णा दादा शिराळे तसेच जिजाऊ नगर कॉलनी येथील तसेच बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर ,वकील ,प्राध्यापक व्यावसायिक यांची उपस्थिती होती



**बीड : येथे नगर परिषद कर्मचाऱ्यांकडून वृद्ध शेतकरी महिलेचा भाजीपाला कचरा गाडीत टाकल्याच्या घटनेनंतर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी पीडित जनाबाई दळवी यांची भेट घेऊन आर्थिक मदत करत धीर दिला. यावेळी राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे, अविनाश जोगदंड, विलास मोमीन, के.के. कांबळे, धम्मा पारवेकर आदी उपस्थित होते.**

# अंबाजोगाईला 'पुस्तकांचे गाव' बनवण्यासाठी हालचाली गतिमान

## जिल्हा मराठी भाषा समितीला अहवाल सादर करण्याचे आदेश

अंबाजोगाई : ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या अंबाजोगाई शहराला 'पुस्तकांचे गाव' म्हणून घोषित करण्याच्या प्रक्रियेला आता प्रशासकीय पातळीवर वेग आला आहे. राज्य मराठी विकास संस्थेने या संदर्भात बीडचे अपर जिल्हाधिकारी यांना विशेष पत्र पाठवून यापुढील आवश्यक ती कायदेशीर व तांत्रिक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी केलेल्या मागणीनंतर या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय स्तरावर वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत.

या योजनेच्या पार्श्वभूमीवर, केज मतदारसंघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी अंबाजोगाई शहराला पुस्तकांचे गाव म्हणून मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. या प्रस्तावानुसार राज्य मराठी विकास संस्थेने अंबाजोगाई शहराची भौगोलिक माहिती आणि या उपक्रमात स्वेच्छेने सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या ग्रामस्थांची माहिती मागवली होती. याला सकारात्मक प्रतिसाद देत अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अंबाजोगाई शहराचा सविस्तर नकाशा, सविस्तर माहिती आणि स्थानिक नागरिकांचे अर्ज राज्य मराठी विकास संस्थेला सादर करण्यात आले आहेत. यामध्ये अंबाजोगाई शहरातील एकूण ५ संस्था आणि ६ खाजगी व्यक्तींनी या योजनेत सक्रिय सहभागी होण्यासाठी अधिकृत अर्ज केले आहेत.

राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ.शामकांत देवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोणत्याही गावाची पुस्तकांचे गाव म्हणून निवड करण्यापूर्वी त्या गावाची प्रत्यक्ष पाहणी करणे बंधनकारक आहे. याच नियमाच्या आधारे अपर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर अंबाजोगाई शहराची प्रत्यक्ष पाहणी पूर्ण करावी आणि त्याबाबतचा सविस्तर अहवाल लवकरात लवकर राज्य मराठी विकास संस्थेकडे पाठवावा, असे आदेश पत्राद्वारे देण्यात आले आहेत. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अंबाजोगाईला 'पुस्तकांचे गाव' म्हणून अधिकृत घोषित करण्याबाबत पुढील अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

## लिंबागणेश येथे दिमाखदार 'धर्मवीर केशरी' बैलगाडी शर्यत संपन्न!

# "बैलगाडी शर्यत म्हणजे शेतकरी संस्कृतीचा उत्सव" : राजेंद्र मस्के

## प्रथम विजेत्यास राजेंद्र मस्के यांच्याकडून ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस

बीड प्रतिनिधी :

बैलगाडी शर्यत ही गावकुसातील सामाजिक ऐक्य, जिद्द आणि कृषी परंपरेचे दर्शन घडवणारी लोकपरंपरा असून, ग्रामीण संस्कृतीचे जिवंत प्रतीक आहे. शेतकऱ्याने कष्टाने आणि प्रेमाने वाढवलेले बैल मैदानात धावताना केवळ वेगाचे प्रदर्शन करत नाहीत, तर कष्ट, निष्ठा आणि मातीतल्या नात्याचे अविस्मरणीय दर्शन घडवतात. ग्रामीण जीवनातील उत्साह आणि शेतकरी संस्कृतीचा खरा उत्सव म्हणजे बैलगाडी शर्यत होय, असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले.

**बैलगाडी शर्यतीतील प्रथम विजेत्या स्पर्धकासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या वतीने ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस आयोजकांकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी अमर आबदार,अँड गणेश वाणी, अशोक वाणी, विक्की वाणी,बालकृष्ण थोरात,राजाभाऊ गिरे,दत्तात्रेय मोरे , दादासाहेब गायकवाड,अक्षय आबदार, महेश ढवळे,बाळासाहेब मोरे,शेख समीर, निर्मळ, चव्हाण,उध्दव जाधव ,सुरज ढवळे, कैलास काटे, रोहित भोसले, दिनेश ढवळे सह आदी उपस्थित होते.**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे भव्य बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. अनावश्यक खर्चाला फाटा देत, येथील तरुणांनी पशुपालक आणि शेतकरी बांधवांना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करून महापुरुषांच्या जयंतीला विधायक दिशा देण्याचे कौतुकास्पद कार्य केले, असेही मस्के यांनी नमूद केले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील बैलगाडी शर्यत रसिकांनी मोठी गर्दी केली होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि प्रेक्षकांच्या जल्लोषात संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला होता. ग्रामीण वातावरणात या स्पर्धेमुळे वेगळीच ऊर्जा आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती : अध्यक्ष श्रावण कुकर, उपाध्यक्ष पंकज सरवदे, सचिव अरुण लांडे यांची निवड



परळी प्रतिनिधी : परळी वैजनाथ येथील राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त परळी शहरातील होळकर चौक येथे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांच्या निवडी जाहीर झाले आहेत. राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती अति उत्साहात निघणार असून त्यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्ष श्रावण कुकर उपाध्यक्ष पंकज सरवदे तर सचिव पदी अरुण लांडे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी बैठकीला सर्वांनी एकमताने मंजुरी दिली.

यावेळी बैठकीला उपस्थित माजी नगरसेवक गोविंद कुकर,युवा नेते मुंजा फुके,राम कुकर,नवनाथ दाणे,अमोल सरवदे, सचिन जगाडे,सटवा सरवदे,आकाश कुकर,माणिक सरवदे, साहेबराव खाटिक, राजेश धुमाळ,आश्रोबा सरवदे,परमेश्वर होळकर,अनिल सरवदे,नवनाथ सरवदे, गणपत कुकर, नितीन सरवदे. आकाश सरवदे. मच्छिंद्र सरवदे. भरत सरवदे. बिरू सरवदे. ऋषिकेश कुकडे. दादाराव फुके. माणिक फुके. विष्णू फुके. भरत होळकर.,किशोर सरवदे,शाम कुकर,महादु सरवदे,शाम लगस्कर, वैभव सरवदे,महादु जावडे,विष्णू सरवदे,गोविंद चिवडे,गणेश भंडारे, आकाश कुकर,मुंजा सरवदे, मंगेश सरवदे,वैजनाथ जगाडे,सुरेश सोनटक्के,शाम भंडारे,सतिश सरवदे, मुंजा धुमाळ,सचिन दाणे,राम सरवदे, राम होळकर,बजरंग सरवदे,कैलास लांडे, निखिल सरवदे आदी कार्यकर्त्यांनी केले आहे.

# माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूलच्या १२ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**बीड** | महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या अत्यंत प्रतिष्ठेच्या शालेय शिष्यवृत्ती परीक्षेत बीड येथील 'माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेचा झेंडा फडकावला आहे. अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक परीक्षेत शाळेतील तब्बल १२ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक वर्तुळातून आणि पालक वर्गातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने 26 व 27 मे रोजी उंदरी येथे खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ; पुरस्कार वितरण, शेतकरी मेळाव्याचे आयोजन

अंबाजोगाई : कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या नांवे असलेल्या स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने मंगळवार, दिनांक २६ व बुधवार, दिनांक २७ मे २०२६ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथे विविध उपक्रम तसेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ही होणार आहे. या सर्व कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, विद्यार्थीप्रिय दिवंगत सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त मंगळवार, दिनांक २६ मे रोजी सायंकाळी ७ वाजून १५ मिनिटांना उंदरी (ता. केज) येथे खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अशोक थोरात (संचालक, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुंबई.) आणि उद्घाटक म्हणून डॉ.नरेंद्र काळे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य दंत परिषद तथा सचिव, बनेश्वर शिक्षण संस्था, बनसारोळा.) हे असणार आहेत. यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ.सय्यद रफिक पारनेरकर (संत साहित्याचे गाढे अभ्यासक तथा सचिव, सद्भावना मंच, महाराष्ट्र.), वृक्षमित्र सुधाकर देशमुख (महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त.), डॉ.वसंत सुर्यवंशी (विस्तार कृषि विद्यावेत्ता, विकृविशिकें, लातूर.) यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच बुधवार, दिनांक २७ मे रोजी सकाळी ठिक ९.३१ ते ९.४० या वेळेत वृक्ष पुजन व संवर्धन करण्यात येवून सकाळी १० वाजता नियोजित कार्यक्रमास सुरूवात होईल. उंदरी (ता.केज) येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती भवन येथे अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त पुरस्कार वितरण व शेतकरी मेळावा देखिल आयोजित करण्यात आला आहे. या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन डॉ.अशोक ढवण (माजी कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.) यांच्या हस्ते होईल. तर या कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी डॉ.वेदप्रकाश पाटील (माजी कुलगुरू, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.) हे असणार आहेत. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून नंदकिशोर मुंदडा (नगराध्यक्ष, नगरपरिषद, अंबाजोगाई.), रमेशराव आडसकर (चेअरमन, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना.लि.अंबाजोगाई.), पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा मतदारसंघ संघ.), डॉ.उदय खोडके (माजी संचालक शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.), ॲड.राजेश्वर चव्हाण (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.), बीड.), राहुल सोनवणे (जिल्हाध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, बीड.) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असणार्या ६ मान्यवरांना कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती पुरस्कार तर अन्य २ जणांना अनुक्रमे स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील व स्व. सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. एकूण ८ पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा समावेश आहे. त्यातील शिवाजीराव परबतराव जाधव (मु.पो.चिकलठाणा, ता.जि.लातूर.) यांना विक्रमी ऊस उत्पादन व शेतकरी स्वावलंबन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुशल कारभारी किसान पुरस्कार-२०२६, डॉ.प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील (मु.पो.बोरगाव (धनेश्वरी), ता.कळंब, जि.धाराशिव.) यांना बंधुत्व, माता-पिता सेवा, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती आदर्श बंधू भरत व भक्त पुंडलिक पुरस्कार-२०२६, सौ.संगीता शरद झरे (मु. पो.बुधोडा, ता.औसा, जि.लातूर.) यांना सामाजिक, सेंद्रिय शेती, महिला व अनाथ-पिडीतांची सेवा व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती सामाजिक सेवा पुरस्कार-२०२६, अरूण माधवराव समुद्रे (मु.पो.ता. जि.लातूर.) यांना पत्रकारिता, आकाशवाणी, दूरदर्शन, शिक्षण व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती पत्रकारिता पुरस्कार-२०२६, श्रीमती लक्ष्मीबाई प्रभाकर कराड (मु. पो.सायगाव, ता.रेणापूर, जि.लातूर.) यांना नैसर्गिक शेती, वृक्ष संवर्धन, महिला जागृती आणि समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी स्व. सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुशल कारभारीन किसान पुरस्कार-२०२६, डॉ.छगन जयसिंग राठोड (मु.पो.वासली, ता.पातूर, जि.अकोला.) यांना सेंद्रिय शेती, महिला सक्षमीकरण व पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती कृषिउद्योग भूषण पुरस्कार-२०२६, डॉ.सय्यद रफिक पारनेरकर (मु.पो.ता. पारनेर, जि.अहिल्यानगर.) यांना वारकरी सांप्रदायिक प्रबोधन, साहित्य निर्मिती, वैद्यकीय सेवा व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती सद्भावना पुरस्कार-२०२६

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाशी उपकेंद्रातून १७.९० लाखांचा मुद्देमाल लंपास

### कॉपर कॉईल व ट्रान्सफॉर्मर ऑईल चोरी

तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.२४ मे -**

वाशी पोलीस ठाणे हद्दीतील वाशी उपकेंद्रामधून तब्बल १७ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१६ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने वाशी उपकेंद्रामधून १८०० किलो कॉपर कॉईल तसेच ३४०० लिटर ट्रान्सफॉर्मर ऑईल असा एकूण १७ लाख ९० हजार रुपयांचा माल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी पराग दादाराव तुरखडे (वय ४१, रा. ब्राम्हणसभा कॉलनी, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती, ह.मु. वाशी ता. वाशी जि. धाराशिव) यांनी दि. २२ मे २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरावरून वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस करत असून उपकेंद्रातील सुरक्षेच्या व्यवस्थेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### संतोष माळी यांनी गटशिक्षणाधिकारी पदाचा स्वीकारला

**कळंब, दि.२४ मे -**

पंचायत समिती कळंब अंतर्गत गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या आदेशान्वये संतोष माळी यांनी स्वीकारला आहे. यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, ईटकुर केंद्रप्रमुख सोमनाथ चंदनशिव, मोहा केंद्रप्रमुख आशोक डिकले आदी मान्यवरांनी संतोष माळी यांचे अभिनंदन करून दत्तात्रय बारगजे लिखित फकीरी : एक अवघड प्रवास ही कादंबरी भेट देत सत्कार केला. संतोष माळी यांच्याकडे उपशिक्षणाधिकारी (नियोजन) धाराशिव या पदाचा अतिरिक्त कार्यभारही आहे. कार्यकुशल, सर्वसमावेशक व कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून त्यांची ओळख असून त्यांच्या नेतृत्वाखाली कळंब तालुका गुणवत्तेच्या बाबतीत आघाडीवर राहील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

### फातेमा मुखेर यांना पीएचडी पदवी प्रदान

**भूम, दि.२४ मे -**

भूम तालुक्यातील माणकेश्वर येथील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका फातेमा इरफान मुखेर यांना डॉ. बाबासाहेब




आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली आहे. त्यांनी ऑस्ट्रेलियन कादंबरीकार रिचर्ड फ्लनॅगन यांचे साहित्य या विषयावर प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने (२०२५-२६) २४१-५१ या पत्राद्वारे त्यांना पदवी प्रदान केली. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. मेहरून्नीसा पठाण यांचे मार्गदर्शन लाभले. फातेमा मुखेर सध्या बीड येथील मिल्लिया कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाच्या अध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या सचिव श्रीमती सबीया खान, प्राचार्य डॉ. इरफान सिद्दीकी तसेच डॉ. फैसल चाऊस यांनी अभिनंदन केले आहे. पीएचडीच्या प्रवासात त्यांना मातोश्री, पती व बंधू यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

### मधुकर जोशी यांचे निधन

**धाराशिव, दि.२४ मे -**

धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.) येथील ग्रामजोशी मधुकर व्यंकटेश जोशी यांचे पुणे येथील



भारती हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८१ वर्षे होते. त्यांच्या निधनाने पाडोळी परिसरासह पंचक्रोशीतील सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. ते महेश जोशी तसेच सचिन जोशी यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दोन सुना व तीन नातवंडे असा परिवार आहे.

### धाराशिवात जुगार अड्ड्यांवर छापे

**धाराशिव, दि.२४ मे -**

जुगार विरोधी कारवाईदरम्यान धाराशिव शहर पोलिसांनी दि.२२ मे रोजी शहर पोलीस ठाणे हद्दीत दोन ठिकाणी छापे टाकून मटका जुगार प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या कारवाईत विजय रावसाहेब गुंडरे (वय २८, रा. यमाई मंदिराजवळ, धाराशिव) हे श्रीदेवी नाईट मटका जुगाराचे साहित्य व ६८० रुपयांची रक्कम स्वतःच्या ताब्यात बाळगताना पोलिसांना आढळले. तर दुसऱ्या कारवाईत ओमकार सुनिल शिंदे (रा. सांजा, ता. जि. धाराशिव) हे जे. के. तांबोळी यांच्या पानटपरीसमोर मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य व ४९० रुपयांची रक्कम बाळगताना आढळून आले.

# चालत्या ट्रकमधून मेंढ्या चोरीचा पर्दाफाश; ३.१९ लाखांचा मुद्देमाल जप्त

### येरमाळा पोलिसांची धडक कारवाई...

तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.२४ मे -**

येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत दि.२३ मे २०२६ रोजी पहाटे हायवेवरून जाणाऱ्या चालत्या ट्रकमधून अज्ञात चोरट्यांनी मेंढ्या चोरून नेल्याची घटना घडली होती. या घटनेचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखा आणि येरमाळा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ३ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार स्थागुशा पथक, आरसीपी पथक क्रमांक १ आणि क्यूआरटी पथक रवाना करण्यात आले होते. पोलीस पथक येरमाळा हायवेवरील पुलाजवळ तपास करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तेरखेडा येथील लक्ष्मी पारधी पिढी आणि उमरा पारधी पिढी येथील काही इसमांनी चालत्या ट्रकमधून मेंढ्या चोरी करून आणल्या असून त्या उमरा पिढीजवळील बाभळीच्या झाडाखाली उभ्या असलेल्या लाल रंगाच्या टमटममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. यानंतर तात्याराव भालेराव आणि पोलीस कर्मचाऱ्यांसह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तेथे एका बाभळीच्या झाडाखाली लाल रंगाचे टमटम उभे असल्याचे दिसून आले. टमटमजवळ ७ ते ८ इसम बसलेले होते. पोलिसांची चाहूल लागताच संबंधित इसमांनी घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला, मात्र आरोपी पसार होण्यात यशस्वी झाले.

पोलिसांनी टमटमची तपासणी केली असता त्यामध्ये मेंढ्या आढळून आल्या. फिर्यादीशी संपर्क साधून मेंढ्यांचे वर्णन सांगितले असता त्या चोरी गेलेल्या मेंढ्याच असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मेंढ्या आणि टमटम असा एकूण ३ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी येरमाळा पोलीस ठाणे येथे जमा करण्यात आला.



ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सचिन खटके, सपोनि. तात्याराव भालेराव, पोलीस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर, महिला पोलीस हवालदार शोभा बांगर, पोना संतोष तिघाडे, संदीप चौघुले, रोहित दंडनाईक तसेच आरसीपी आणि क्यूआरटी पथकाने पार पाडली.

## विंड वर्ल्ड कंपनीचा जुना वाद पुन्हा ऐरणीवर

### थकीत पैशांवरून शेतकऱ्यांचा संताप

तभा वृत्तसेवा

**वाशी, दि.२४ मे -**

वाशी तालुक्यात पुन्हा सुरू होत असलेल्या विंड वर्ल्ड पवनचक्की कंपनीच्या कामांमुळे जुना वाद पुन्हा पेटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. कंपनी बंद होताना अनेक शेतकऱ्यांचे जमिनीचे भाडे तसेच स्थानिक नागरिकांच्या पगारी वाहनांचे भाडे थकीत ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप बाधित शेतकऱ्यांनी केला आहे.

मसोबाचीवाडी, कडकनाथवाडी, वडजी आणि नांदगाव परिसरातील शेतकरी मागील अनेक वर्षांपासून आपल्या हक्काच्या पैशांसाठी पाठपुरावा करत आहेत. मात्र अद्यापही संबंधितांना पूर्ण पैसे मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रकरणी बाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रारी दाखल करून न्यायाची मागणी केली आहे. अगोदर शेतकऱ्यांचे आणि वाहनधारकांचे थकीत पैसे द्या, त्यानंतरच कंपनीची कामे सुरू करा, अशी ठाम भूमिका स्थानिकांनी घेतली आहे. दरम्यान, कंपनीच्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेत पुढील १५ दिवसांत संबंधितांचे पैसे देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे तोंडी आश्वासन देण्यात आल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. मात्र विशेष बाब म्हणजे यासंदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी माहिती देण्यास स्पष्ट टाळाटाळ केल्याचे समोर आले आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अधिकृत भूमिका मांडण्यास नकार दिल्यामुळे संशय अधिक गडद झाला आहे. नेमके किती शेतकऱ्यांचे पैसे थकीत आहेत? कंपनी प्रत्यक्षात पैसे देणार की पुन्हा वेळकाढूपणा करणार? याबाबत अधिकाऱ्यांकडून मौन बाळगले जात असल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.



यापूर्वीही पवनचक्की कंपन्यांविरोधात धाराशिव जिल्ह्यात मोठी आंदोलने उभी राहिली होती. त्यामुळे विंड वर्ल्ड कंपनीने तात्काळ ठोस निर्णय घेतला नाही तर पुन्हा एकदा शेतकरी रस्त्यावर उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## विधान परिषद निवडणुकीत रंगत वाढली

तभा वृत्तसेवा

**नळदुर्ग, दि.२४ मे -**

राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर धाराशिव-बीड-लातूर मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. १८ जून रोजी होणाऱ्या या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. महायुतीकडून भाजपच्या वाट्याला ही जागा जाण्याची शक्यता असून माजी आमदार बसवराज पाटील, दत्ताभाऊ कुलकर्णी, अर्चना पाटील-चाकूरकर आणि नितीन काळे यांच्या नावांची चर्चा आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे माजी आमदार धीरज देशमुख आणि अशोक जगदाळे यांची नावे आघाडीवर आहेत. २०१८ च्या निवडणुकीत भाजपचे सुरेश धस यांनी अपक्ष उमेदवार अशोक जगदाळे यांचा ७२ मतांनी पराभव केला होता. सध्याच्या संख्याबळानुसार महायुतीकडे ५३७ तर महाविकास आघाडीकडे २४१ सदस्यांचे पाठबळ असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, अशोक जगदाळे यांनी पुन्हा निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली असून काँग्रेसकडून उमेदवारी मिळाल्यास रिंगणात उतरणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

## डिझेल तुटवड्यामुळे शेतीकामे खोळंबली; शेतकरी चिंतेत

तभा वृत्तसेवा

**वाशी, दि.२४ मे -**

इराण-अमेरिका-इस्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधन तुटवड्याची झळ आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बसू लागली आहे.

पावसाळा तोंडावर आला असून शेतकरी पूर्वमशागतीच्या कामात व्यस्त असतानाच डिझेल टंचाईमुळे शेतीची कामे अडचणीत आली आहेत. नांगरणी, मोघडणी, कुळवणी यांसारखी बहुतांश शेतीकामे ट्रॅक्टरच्या सहाय्याने केली जात असल्याने डिझेलअभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरवठा कमी झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून तासन्तास प्रतीक्षा करूनही अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

डिझेल तुटवडा कायम राहिल्यास खरीप हंगामाच्या तयारीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## तुळजाभवानी दर्शनासाठी लाखोंची गर्दी; तुळजापूरनगरीत भक्तिमय वातावरणात



तभा वृत्तसेवा

**तुळजापूर दि.२४ मे -**

उन्हाळी सुट्ट्या, शनिवार-रविवारची जोड तसेच सलग सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभ घेत राज्यासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि विविध राज्यांतून लाखो भाविकांनी श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. त्यामुळे संपूर्ण तुळजापूर नगरी भक्तिमय वातावरणाने फुलून गेली असून मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची प्रचंड वर्दळ पाहायला मिळत आहे.

पहाटेच्या आरतीपासूनच दर्शन रांगा मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून बाहेरील मार्गांपर्यंत पोहोचल्या होत्या. अनेक भाविकांनी रात्रीपासूनच दर्शनासाठी रांगेत थांबून आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले.

जय भवानी... जय तुळजाभवानी... च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता मंदिर संस्थान प्रशासन, पोलीस विभाग आणि नगरपालिकेकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. गर्दी नियंत्रणासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून मंदिर परिसरात सीसीटीव्हीच्या माध्यमातून सतत नजर ठेवण्यात येत आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह आलेल्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी बॅरिकेड्स उभारण्यात आले असून शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक शाखेकडून विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.

भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे तुळजापूरमधील हॉटेल, लॉज, भोजनालये, प्रसाद विक्रेते, फुलविक्रेते तसेच पूजा साहित्य विक्रेत्यांच्या व्यवसायालाही मोठी चालना मिळाली आहे. बाजारपेठेत दिवसभर खरेदीसाठी गर्दी होत असून व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



काही भाविकांनी, आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी कितीही गर्दी असली तरी मनाला वेगळे समाधान मिळते. आईच्या दर्शनाने सर्व थकवा दूर होतो, अशी भावना व्यक्त केली.

रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची रांग कायम असल्याने तुळजापूर नगरीत यात्रेसारखे वातावरण निर्माण झाले आहे.

# २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना दिलासा; नगर परिषद कळंबकडून नियमितीकरण मोहिमेला वेग

तभा वृत्तसेवा

**कळंब, दि.२४ मे -**

राज्य शासनाने २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी नगर परिषद कळंब कडून सुरू करण्यात आली असून त्यामुळे शहरातील शेकडो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना आता अधिकृत मालकी हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे शहरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून नगर परिषद प्रशासनाचे स्वागत करण्यात येत आहे.



कळंब शहरातील बसस्थानकाच्या पाठीमागील परिसर, सरकारी दवाखान्यामागील भाग, कल्पना नगर पारधी वस्ती, जुने पोलीस स्टेशन समोरील परिसर, कळंब कन्या शाळेसमोरील भाग तसेच इतर अनेक वस्त्यांमधील रहिवाशांना या निर्णयाचा थेट लाभ होणार आहे. अनेक वर्षांपासून नागरिक अतिक्रमणाच्या भीतीत राहत होते.

मात्र शासनाच्या नव्या धोरणामुळे त्यांना आता कायदेशीर संरक्षण आणि मालकी हक्क मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नगर परिषद कळंबच्या अध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे. नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला. शहरातील विविध भागांना भेटी देऊन त्यांनी अतिक्रमणधारक नागरिकांशी संवाद साधला आणि नियमितीकरण प्रक्रियेबाबत माहिती दिली. त्यांच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> आमचे आजोबा-पंजोबा पूर्वीपासून येथे राहत आहेत. त्यामुळे आम्ही ही जागा सोडू शकत नाही. शासनाने आमच्या कुटुंबीयांचा विचार करून आम्हाला आमच्या हक्काचे घर द्यावे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. नियमितीकरण प्रक्रियेची माहिती देत नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या निर्णयामुळे भविष्यात स्थैर्य मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. तसेच शासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नगर परिषद कर्मचाऱ्यांनी आवश्यक ते मार्गदर्शन करून सहकार्य केल्याचे नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांनी सांगितले.

मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी शासन निर्णयांचा सखोल अभ्यास करून नियमितीकरणासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यास सुरुवात केली आहे.

संबंधित लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे जमा करण्याची कामे वेगाने सुरू असून नगर परिषद कर्मचारी नागरिकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करत आहेत. अर्ज प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठीही विशेष मदत करण्यात येत आहे.

यासंदर्भात बोलताना नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांनी सांगितले की, हा निर्णय नगर परिषद कळंबच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. सर्वसामान्य कुटुंबांना याचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.

नगर परिषद प्रशासनाने पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

शासन नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना नियमितीकरणाचा लाभ दिला जाणार असून कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# संसार, संघर्ष अन् शिक्षणाची जिद्द!

## अंजली पेंटलवार यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी मिळविले बारावीचे यश; महिलांसमोर उभा केला प्रेरणेचा आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. २४ मे -**

शिक्षणाला वयाची मर्यादा नसते, जिद्द असेल तर परिस्थितीलाही हरवता येते, हे आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे बिलोली तालुक्यातील पिंपळगाव (कुं) येथील सौ. अंजली नागनाथ पेंटलवार यांनी. संसाराची जबाबदारी, तीन मुलांचे संगोपन, आर्थिक अडचणी आणि रोजच्या संघर्षमय आयुष्यातून मार्ग काढत त्यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी बारावीच्या परीक्षेत ५५.६७ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाने परिसरात महिलांसाठी प्रेरणेचा नवा दीप प्रज्वलित झाला आहे.



देगलूर तालुक्यातील मंडगी हे त्यांचे माहेर. अल्पवयातच २०११ मध्ये त्यांचा विवाह पिंपळगाव (कुं) येथील नागनाथराव पेंटलवार यांच्याशी झाला. लग्नानंतर संसार, शेती, मुलांचे संगोपन आणि घरची बेताची परिस्थिती यामध्ये त्यांचे शिक्षण अर्धवट राहिले. संसारवेलीवर कु. नक्षत्रा, कु. ईश्वरी आणि अभिजीत ही तीन मुले फुलली; मात्र मुलांना शिकवताना स्वतःचे अपूर्ण शिक्षण त्यांच्या मनाला सतत खुणावत राहिले.

दरम्यान, मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी कुंडलवाडी येथील कै. गंगाबाई सब्बनवार प्राथमिक शाळेत मुलांना प्रवेश दिला. मुलांच्या शिक्षणावर स्वतः लक्ष ठेवता यावे आणि कुटुंबाला हातभार लागावा म्हणून त्या याच शाळेत गेल्या तीन वर्षांपासून खिचडी शिजविण्याचे काम करत आहेत. हातात पळी आणि मनात शिक्षणाची ओढ घेऊन त्या रोज संघर्ष करत राहिल्या.

विशेष म्हणजे, लग्नाच्या काळात त्यांचा दहावीच्या इंग्रजी विषयाचा पेपर राहिल्याने शिक्षण थांबले होते. मात्र हार न मानता त्यांनी पुन्हा पुस्तके हातात घेतली. शाळेतील प्रा. शंकर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दहावी पूर्ण केली आणि नंतर अकरावीमध्ये प्रवेश घेतला. दिवसभर घरकाम, मुलांची जबाबदारी आणि शाळेतील काम सांभाळून रात्री अभ्यास करत त्यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये बारावीची परीक्षा दिली आणि ५५.६७ टक्के गुण मिळवत यशाला गवसणी घातली.

त्यांचे हे यश केवळ एका परीक्षेतील गुण नाहीत, तर प्रतिकूल परिस्थितीवर मिळविलेला विजय आहे. आज अनेक महिलांना संसाराच्या ओझ्याखाली स्वतःची स्वप्ने गाडावी लागतात; मात्र सौ. अंजली पेंटलवार यांनी इच्छाशक्ती असेल तर अशक्य काहीच नाही हे सिद्ध करून दाखविले आहे. आता पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करण्याचा त्यांचा निर्धार आणखी प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या या कर्तृत्वाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. प्रशांत सब्बनवार, मुख्याध्यापक कल्याण गायकवाड, नागनाथ चेटलुरे, प्रा. श्रीनिवास गोविंदराव, प्रा. डॉ. महेश कोंडावार, प्रा. रमेश परसुरे, सारिका सब्बनवार, शाम पवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन त्यांचा सत्कार केला.

ग्रामीण भागातील महिलांसाठी सौ. अंजली पेंटलवार यांची ही यशोगाथा आज प्रेरणेचा दीप बनली असून, संसार सांभाळतानाही स्वप्नांना पंख देता येतात, हा आत्मविश्वास त्यांच्या कर्तृत्वाने अनेकांना दिला आहे.

# किनवट तहसील कार्यालयात स्वच्छतेचा बोजवारा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २४ मे -**

तालुक्यातील सार्वजनिक शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छतेचा अभाव दिसून येत असून विशेषतः किनवट तहसील कार्यालय येथे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील १३४ गावांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या महत्त्वाच्या कार्यालयात प्राथमिक सुविधांचाच अभाव असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे.



कार्यालयातील शौचालये व बाथरूम महिने महिने साफ केली जात नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. तहसील मधे बसण्यासाठी पुरेशा खुर्च्यांची व्यवस्था नसल्याने दूरवरून आलेल्या महिला, ज्येष्ठ नागरिक व शेतकऱ्यांना उभे राहून प्रतीक्षा करावी लागत आहे. तसेच पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची सोयही नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. किनवट तालुका नांदेड जिल्ह्यातील मोठ्या तालुक्यांपैकी एक असून दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी तहसील कार्यालयात येत असतात. मात्र अधिकारी वेळेवर भेटत नसल्याच्या तक्रारीं नागरिकांकडून येत आहेत.

राज्यात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविले जात असताना तहसील कार्यालयातच अस्वच्छतेचे साम्राज्य असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. स्वच्छतेची सुरुवात तहसील कार्यालयापासून व्हावी, तसेच येथील सर्व शासकीय कार्यालयात स्वच्छता, व ईतर सोयी सुविधा उपलब्ध करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तसेच तहसीलदार व जिल्हाधिकारी यांनी तातडीने लक्ष घालून स्वच्छ शौचालये, पिण्याचे स्वच्छ पाणी, बसण्याची व्यवस्था आणि नागरिकांसाठी इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# खाजगी कार्यालयातून चालतो तलाठ्यांचा कारभार

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. २४ मे -**

गावपातळीवरील अत्यंत महत्वाची कामे करण्यासाठी तलाठी यांची नेमणूक केलेली असताना सदरील तलाठी नेमून दिलेल्या गावांना भेटी देत नसल्यामूळे शेतकऱ्यांची अनेक कामे प्रलंबित आहेत मूख्यालयी न राहता भोकर येथे खाजगी कार्यालयात बसून गावची कामे करणाऱ्या तलाठी कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी माजी जि.प.सदस्य सूनिल चव्हाण यांनी केली आहे.

किनी,भूरभूशी सह अन्य गावचे तलाठी अमावस्या व पोर्णिमेला गाव भेटी देत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना मूख्यालयी राहून जमिनीची नोंद ठेवणे शासनाकडे महसूल गोळा करणे, महसूल कर ७/१२ ८अ आणि फेरफार नोंदवही यासारखी महत्वाची कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, खरेदी विक्रि वारसाची नोंद इतर कारणामूळे मालकी हक्कात होणाऱ्या बदलांची नोंद करणे, तसेच शालेय विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला रहिवाशी जातीचा दाखला देणे गावपातळीवर राबविल्या जाणाऱ्या विविध शासकिय योजनेच्या अमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती माहिती व मदत करणे,नैसर्गिक आपत्तीच्या वेळी पिकांच्या नूकसानीचे पंचनामा करणे अशी विविध कामे करण्याच्या सूचना असताना शहराच्या ठिकाणी खाजगी कार्यालये थाटून गावचा कारभार पाहत असल्याने विविध कामे प्रलंबित आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी शेतकरी शहरात येवून ग्राम महसूल अधिकारी यांचा शोध घेत आहेत.वरिष्ठांनी तलाठ्यांच्या कारभाराकडे लक्ष देवून मूख्यालयी राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात अशी मागणी होत आहे. नेमून दिलेल्या गावांना तलाठी नियमित येत नसल्याने ग्रामीण भागातील सर्व सामान्य शेतकरी विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. खाजगी कार्यालये कधी बंद तर कधी चालू असते यामूळे जनतेची कामे वेळेवर होत नाहीत तलाठ्यांना नेमून दिलेल्या गावात राहून सामान्य जनतेची कामे वेळेत करण्याच्या सूचना वरिष्ठांनी द्याव्यात तसेच नियमित गावभेटी न देणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी यांची चौकशी करण्याची मागणी सर्वत्र होत आहे.

# श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २४ मे -**

येथील श्री साई मंदिर संस्थान व गौशाळा, कौठाच्या ३६ व्या वर्धापण दिनानिमित्त दि. २५ मे ते १ जून २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भाविकांना दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथाकार ह.भ.प. प्रवीण महाराज पार्डीकर यांच्या अमृतवाणीतून कथा श्रवणाचा लाभ मिळणार आहे. तसेच नित्य पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ६.३० ते ७.३० श्री साईबाबांचा अभिषेक, सकाळी ८ ते ११ श्री साई चरित्र पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्रौ ८ ते १० हरिकीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत.

तसेच दि. १ जून रोजी सांगता सोहळ्यात सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. गोपाळ महाराज ठाकूरबुवा पंढरपूरकर यांचे काल्याचे कीर्तन व तद्नंतर महाप्रसाद भंडारा होणार आहे. तरी भाविकांनी दर्शनाचा, श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, सचिव श्रीराज चक्रवार व कोषाध्यक्ष जगन्नाथ चक्रवार आणि विश्वस्त मंडळ श्री साई संस्थान व गौशाळा, कौठा वसरणीच्या वतीने करण्यात आले आहे.

## उषाताई मोरे यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

**नवीन नांदेड** -अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिल्या जाणारा यावर्षीचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६ सिडकोच्या सामाजिक कार्यकर्त्या सौ. उषाताई अनिल मोरे यांना जाहीर झाला आहे. फुले- शाहू -आंबेडकर चळवळीतील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैचारिक, कलात्मक अशा विविध पैलूंनी निः स्वार्थीपणे कार्य असलेल्या सप्त गुणांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सने यंदाचा २०२६ चा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी सामाजिक कार्यकर्चंत्या सौ.उषाताई अनिल मोरे यांची निवड झाल्याचे पत्र संबंधित संस्थेच्या निवड समितीचे पत्र निवड समितीचे प्रमुख ड.सुजाता पोहरे नांदेड, डी. एस. वाघमारे अहमदपूर, बा.रा. वाघमारे नांदेड यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचित्र व सन्मानपत्र असे असून या पुरस्काराचे वितरण शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता नवीन नांदेड सिडको येथे संपन्न होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नातेवाईक, मित्र मंडळीने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने भवरे यांचा गौरव


**नांदेड, दि. २४ मे -**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन नांदेड येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार लक्ष्मणराव मारोतीराव भवरे कामारीकर यांचा गौरव करण्यात आला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांचे वंशज तथा,त्यांचे नातू, इंदू मिल स्मारकाचे प्रणेते, रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते तसेच,रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुशील सुर्यवंशी, राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे, नाशिकच्या दै.महासागरचे वृत्त संपादक सुधीर उमराळकर, निसर्गोपचार तज्ञ रावसाहेब घोडेस्वार,नाशिक मनपाच्या स्थायी समितीचे मा.सभापती संजय साबळे,दक्ष पोलीस टाईम्सचे संजय डोंगरे, भिमकन्या रिलस्टार आसावरी बर्वे आणि संयोजक तथा, संस्थेचे अध्यक्ष अनिल आठवले,सचिव मिलिंद कळवणकर,सुप्रसिद्ध निवेदिका तथा,पत्रकार आश्विनी पुरी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी दि.२३ मे रोजी,समुद्र लॉन्स,नाशिक येथे ज्ञानदिप सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र च्यावतिने देशभरात विविध क्षेत्रांत उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यात नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र लक्ष्मणराव मारोतीराव भवरे कामारीकर यांचा त्यांच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्तुग योगदानाबद्दल समावेश आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासीत जनसामान्यांचे प्रश्न परखडपणे प्रशासनासमोर मांडतांनाच भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार तसेच,वृक्षलागवड व संगोपन,पर्यावरणसमृद्धी आणि शैक्षणिक,सांस्कृतिक आदी क्षेत्रांसह सामाजिक कार्यातही त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो.नांदेड जिल्ह्यात पत्रकारिता क्षेत्रात व विविध सामाजिक संघटनात ते अग्रेसर असतात.त्यांच्या कार्य व कर्तव्यतत्परतेचा सन्मान म्हणून त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला.लक्ष्मणराव मा.भवरे यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.



## भदंत पंय्याबोधी थेरो यांना छ. राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार

**नांदेड** -तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धर्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांना छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने भदंत पंय्याबोधी थेरो यांना निवडपत्र देण्यात आले असून नवीन नांदेडातील सिडको येथे दि. २६ जून २०२६ रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती फोर्सच्या वतीने देण्यात आली. फुले आंबेडकरी चळवळीसह धम्म चळवळीत अग्रेसर असलेल्या भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सदरील पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यावेळी डॉ. सुजाता पोहरे, डी. एस. वाघमारे, बा. रा. वाघमारे, यांची उपस्थिती होती. भदंत पंय्याबोधी थेरो यांना पुरस्कार जाहीर झाल्यामुळे धम्म चळवळीसह सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तथा राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्याबद्दल साधूवाद व्यक्त केला आहे.



# शेतकऱ्यांच्या डिझेल पुरवठ्यासाठी आ. कोहळीकर आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. २४ मे -**

सध्या हदगाव - हिमायतनगर सह पूर्ण जिल्ह्यात खरीप हंगामाची लगबग सुरू असून शेतकरी बांधव हे शेतीचे व इतर कामे ट्रॅक्टर व इतर यंत्रसामग्रीद्वारे करत असतात त्यातच जिल्ह्यात पेट्रोल पंपावरती शेतकरी बांधवांना डिझेल मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असून या कामी आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असून याची दखल आ. बाबुराव कदम कोहळीकरांनी घेत जिल्हाधिकाऱ्याकडे स्पष्ट मागणी केली की, जिल्ह्यात उपलब्ध डिझेल साठ्यापैकी ६०% शेतकरी बांधवांना त्वरित वितरीत करण्यात यावे यामुळे शेतकरी बांधवांचा डिझेल साठी होणारी परवड लवकरच कमी होण्यास मदत होईल असा विश्वास शेतकरी बांधवांमधून व्यक्त होत आहे.

अमेरिका - इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल डिझेलच्या पुरवठ्यावर निर्बंध काहींशी युद्धविरामाच्या घोषणेने साखळी पूर्ववत झाल्यास सदृश्य परिस्थिती असताना सुद्धा डिझेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. सध्या खरीप हंगामात शेतीचे कामे तर पेरणीचे दिवस जवळ आले आहेत शेतकरी बांधव हे पूर्णपणे डिझेलवर अवलंबून आहेत परंतु त्यांना डिझेल भेटत नसल्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच पंपावरती उपलब्ध साठ्यापैकी ६०% डिझेल शेतकरी व कृषी उपयोगासाठी राखीव ठेवण्यात यावा उर्वरित ४०% इंधनात इतर वाहनांसाठी वितरित करण्यात यावे. भरारी पथक स्थापन करण्यात यावी. शेतीसाठी आलेल्या ट्रॅक्टर व कृषी वाहनांना प्रधानांना इंधन देण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात यावेत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पेट्रोल पंपा वरती तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी आग्रही मागणी आ. कोहळीकरांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे केली असून त्यांच्या आक्रमकतेमुळे व वाजवी मागणी केल्यामुळे शेतकरी बांधवांना डिझेलचा पुरवठा लवकरच सुरळीत होईल असा विश्वास शेतकरी बांधवांमधून व्यक्त होत आहे.

**शेतकरी बांधवांच्या अडचणी सोडविण्यास कटिबद्ध :- आ.कोहळीकर**

खरीप हंगामात डिझेल साठी होणारी शेतकरी बांधवांची अडचण लक्षात घेता या कामी त्वरित जिल्हाधिकारी, नांदेड यांनी जातीने लक्ष देऊन हस्तक्षेप करत सन्मानाने शेतकरी बांधवांना डिझेल पुरवठा सुरळीतपणे व्हावा या कामी उपलब्ध साठ्यापैकी ६० टक्के राखीव ठेवण्यात यावा अशी आग्रही व वाजवी मागणी करण्यात आली.



# स्वारातीम' विद्यापीठातील डॉ. पृथ्वीराज तौर यांना फ्रेंड्स ऑफ नवासा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २४ मे -**

दक्षिण आफ्रिकेची राष्ट्रीय लेखक संघटना यांच्यावतीने संघटनेच्या संविधानानुसार आयोजित गेलेल्या महासभेमध्ये साहित्य क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा प्रमुख पाच श्रेणीमध्ये विविध पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. महासभेला दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष कगालेमा मोटलांथे यांची उपस्थिती होती.

जीवन गौरव पुरस्कारासोबतच ग्रँड पॅटर्न ऑफ द आर्ट्स अवार्ड, फ्रेंड्स ऑफ नवासा पुरस्कार, रायझिंग स्टार व प्रेसिडेंटस् अवार्ड हे नॅशनल असोसिएशन ऑफ साऊथ आफ्रिकाच्या वतीने प्रत्येक तीन वर्षांनी देण्यात येणारे पुरस्कार महासभेत प्रदान करण्यात आले.




दक्षिण आफ्रिकेतील मराठी साहित्याचा भाषांतराच्या माध्यमातून प्रसार व संवर्धन केल्याबद्दल व आंतरराष्ट्रीय ऐक्याला बळ दिल्याबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांना 'फ्रेंड्स ऑफ नवासा' हा पुरस्कार देऊन महासभेत सन्मानित करण्यात आले. मानपत्र आणि स्वविशिष्ट पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सुवर्ण झळाळी असणाऱ्या पदकावर अफ्रीका खंडाचा नकाशा व पॅन आफ्रिकन रिबन आहे. डॉ. तौर यांनी दृकश्राव्य उपस्थितीद्वारे हा सन्मान स्वीकारला. डॉ पृथ्वीराज तौर यांच्या समवेत जिदी माजिया (चिन), दाझरा नोव्हाक (क्युबा), मुराद अल सुदानी (पॅलेस्टाइन), वादिम तेरेखिन (रशिया), मार्कोस फ्रेटास (ब्राझिल), झुकिस्वा वॅनर (दक्षिण अफ्रिका), शॅड चिकोटी (मलावी) या लेखकांनाही 'फ्रेंड्स ऑफ नवासा' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारे डॉ. तौर हे पहिलेच भारतीय लेखक व भाषांतरकार आहेत.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर केलेल्या भाषणात डॉ. पृथ्वीराज तौर यांनी नेल्सन मंडेला यांना आपला पुरस्कार अर्पण करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

या सन्मानासाठी कुलगुरू डॉ मनोहर चासकर आणि अन्य अधिकारी यांनी डॉ पृथ्वीराज तौर यांचे अभिनंदन केले.

# नालंदा बुद्ध विहार बेळकोणी येथे बुद्धमूर्ती प्रतिष्ठापनेचा प्रथम वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. २४ मे -**

मागील वर्षी समाजाच्या सर्वच घटकाच्या सहभागातून व नालंदा बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट बेळकोणी (बु.) च्या माध्यमातून अहिल्याबाई होळकर बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर व गगन मलिक फाउंडेशन,नागपूर यांच्याकडून थायलंड या बौद्ध देशातून नालंदा बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट बेळकोणी (बु.) मार्फत मागविलेल्या भव्यदिव्य अशा महाकारुणिक तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या बुद्ध रूपाची प्रतिष्ठापना दिनांक २२ मे २०२५ रोजी गावातील मुख्य रस्त्याने मिरवणूक काढून अतिशय आनंदी वातावरणात नालंदा बुद्ध विहार बेळकोणी (बु.) येथे पूजनीय भन्तेजी व उपस्थित सर्व भिक्खू संघाच्याद्वारे बुद्ध रूपाची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. त्या अद्वितीय व ऐतिहासिक घटनेला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने नालंदा बुद्ध विहार बुद्ध रूपाच्या प्रतिष्ठापनेचा प्रथम वर्धापन दिन दिनांक २२ मे २०२६ रोजी नालंदा बुद्ध विहार बेळकोणी (बु.) येथे साजरा करण्यात आला.



याप्रसंगी सकाळच्या सत्रामध्ये नालंदा बुद्ध विहार येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि नालंदा बुद्ध विहार येथे स्थापित असलेल्या बुद्ध रूपास पुष्पहार अर्पण करून पूजन वंदन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण पंचशिल ग्रहण करण्यात आले. व सायंकाळी ठीक ०८.०० वाजता त्रिशरण पंचशिल सामूहिक वंदना घेण्यात आली. आणि भगवान गौतम बुद्धाच्या त्यागमय जीवनामध्ये अतिशय महत्त्व असलेल्या खिरचे खिरदान व भोजनदान करण्यात आले. याचा आस्वाद सर्व उपासक/उपासिका यांनी घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन व परिश्रम नालंदा बुद्ध विहार चरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष,विजय लक्ष्मणराव लंके, उपाध्यक्ष दिलिप मरीबा कदम, सचिव अशोक मोहनराव वाघमारे, सहसचिव गौतम गंगाधरराव कदम,सदस्य बाबुराव गंगाराम लंके यासमवेत राहुल मरीबा कदम, शेषराव विठ्ठलराव लंके,पिराजी गंगाराम मेळगावे, सखाराम विठ्ठल लंके,वाघमारे गंगाराम पिराजी,लक्ष्मण विठ्ठलराव लंके,निर्वाण शंकरराव कदम,कपिल बाबुराव लंके,सचिन किशनराव वाघमारे,रमेश लक्ष्मण लंके,गौतम संभाजी लोणे,कदम धर्मराज यादव,भगवान बाबुराव लंके यांच्यासह उपासिका रेशमाबाई मरीबा कदम,नागरबाई गंगाधरराव कदम, आशाताई सखाराम लंके, कमलबाई पांडुरंग कदम,लालाबाई भुजंगराव कदम,भारतबाई लक्ष्मण लंके,रमाबाई शेषेराव लंके,रमाबाई किशनराव वाघमारे,श्यामाबाई दिलीप कदम,महानंदाबाई राहुल कदम,कल्पना पिराजी मेळगावे, रमाबाई गौतम कदम, अंजलीताई रमेश लंके, ममताताई कपिल लंके,प्रीतीताई भगवान लंके, वैशाली निर्वाण कदम या सर्वांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय लक्ष्मणराव लंके यांनी केले तर आभार प्रदर्शन गौतम गंगाधरराव कदम यांनी केले.

# पंचशील धम्म ध्वज काढणाऱ्याविरुद्ध कार्यवाही करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. २४ मे -**

लोहा कंधार रोड लगत जायकवाडी वसाहती मध्ये मागील तीस ते पस्तीस वर्षा पासुन बौद्ध बांधवांनी पंचाशिल धम्म ध्वज उभा करून त्याठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत होते. परंतू २१ में रोजी पंचशील धम्म ध्वज काडुन टाकला, व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करून त्याच ठिकाणी विधीवत करुन पंचशील धम्म ध्वज लावण्यात यावा. अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोहा पोलिस स्टेशनला निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

लोहा कंधार रस्त्या लगत जायकवाडी वसाहात आहे.

त्या ठिकणी विविध जाती धर्मातील नागरिक एकोप्याने सण साजरे करतात त्या ठिकाणी हिंदू मंदिर व बौद्ध ध्वज लावून समाज बांधव सण साजरे करत होते.काही काळांनतर ती जागा जायकवाडी प्रकल्प विभागाकाची मूळ मालकाने परत घेऊन ती भु माफिया लॉबीला विक्री केली. जवळपास तीस ते पस्तीस वर्षापासूनचा पंचशील धम्मध्वज भु माफीया व समाज सुधारक मंडळीना समोर करुन तो ध्वज काडुन काढला.

धम्म ध्वज काढणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करून त्याठिकाणी विधीवत संस्कार करुन धम्म ध्वज लावण्यात यावा.असे मागणीचे निवेदन लोहा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांना देण्यात आले. या निवेदनावर व्हि. के. कांबळे, अनिलदादा शायकवाड, वाय. बी. महाबळे, प्रदीपकुमार कांबळे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

**पोचिराम कांबळे यांनी डॉ आंबेडकर नावासाठी प्राणाची अहुती दिल्याचा विसर**

टेंभुर्णी येथील पोचिराम मरिबा कांबळे हे ग्रामपंचायत सदस्य होते. पंचक्रोशीतील आठ, दहा गावच्या सवर्णांनी एकत्र येऊन पोचिराम कांबळे याला जिवंत जाळले. संपूर्ण दलित वसाहतीचीही राखरांगोळी केली. महिलांना मारहाण झाली. मुले, मुलीही हल्ल्यातून सुटल्या नाहीत. पुढे पोचिरामचा मुलगा चंदर कांबळे यांनी आपल्या वडिलांच्या खुनाचा बदला म्हणून गावातील वडिलांचा मारेकरी शेषराव वडजे यांचा खून केला. १९८३ मध्ये गावकऱ्यांनी मग चंदरचा दारूच्या नशेत खून केला.

सुगाव नांदेडपासून तीन कि. मी. अंतरावरील या गावात ४ आगस्ट १९७८ ची क्रूर पहाट उगवली ती जनार्दन मवाडे या नवबौद्धाची क्रूर हत्या करूनच. येथेही सवर्णांने तोच कित्ता गिरवला. जाळपोळ, मारहाण, लुटालुट. एवढेच नव्हे तर सवर्णांनी दलितांच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत विष टाकले होते. बळीरामपूर ऊर्फ धनेगाव गावठाण येथील दलित वस्तीवर सवर्णांनी ४ आगस्ट १९७८ ला हल्ला चढविला. त्यात या गावातील दलितांच्या ८४ झोपड्या जाळण्यात आल्या मराठवाड्यात जास्त संख्येने घरे जाळल्याचे हे दुसरे गाव. पहिले गांव एकलारा या गावात शंभराहून अधिक घरे आगीत जळून राख झाली. धनेगावच्या घटनेत संभाजी घोडके व जिजाबाईच्या नवजात बालकाचा मृत्यू झाला याची सरकार दरबारी नोंद नाही. जळकोट लातूर येथे उग्र सवर्ण जमावाने पोलीस उपनिरीक्षक गोविंद भुरेवार यांना ठाण्यातून बाहेर ओढून बेदम मारहाण करून जिवंत पेटवून दिले आणि भुरेवार यांचा प्राण घेतला नागपुरात ४ आगस्ट १९७८ रोजी निघालेल्या आंबेडकरवाद्यांच्या मोर्चावर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. त्यात अविनाश डोंगरे व ज्ञानेश्वर बुद्धाजी साखरे हे दोघे पंधरा वर्षीय मुले ठार झाली. दिलीप रामटेके, रोशन बोरकर, अब्दुल सत्तार, रतन मंदेडे हे तिघेही याच गोळीबारात ठार झाले. शब्बीर अली काजल हुसैन हे देखील अन्य आंदोलनात झालेल्या पोलीस गोळीबारात मारले गेले. दिवाकर थोरात, भागाजी खिल्लारे, रतन परदेशी, डोमाजी कुत्तरमारे, जनार्दन मस्के, भालचंद्र बोरकर, शीला वाघमारे, मनोज वाघमारे हेदेखील नामांतराचे बळी ठरले.

कुष्णूर येथे ३ व ५ आगस्ट १९७८ रोजी दोन दिवस दलित वस्तीवर हल्ले झाले. गावातील सर्वच बौद्धांची १०५ घरे जाळली. काही कौलारू, मजबूत घरे जळेनात म्हणून गावठी स्फोटकांनी उडवून दिली. दलित गाव सोडून पळाले मराठवाड्यातील जातीय हिंसाचाराने सर्वच सीमा पार केल्या होत्या त्याच्या या कटू आठवणीने आजही दलितांच्या अंगावर काटा उभा राहतो.पण ३० ते ३५ वर्षा पासुन या ठिकाणी आसलेला पंचशिल धम्म अभिमानने त्यागाचा संदेश देत होता ,एके दिवशीं भुखड माफिया व समाज रक्षक या जोड़ गोऴीने धम्मध्वज होत्याचा नव्हता केला .इतिहास साक्षी आहे बहुताश ठिकाणच्या जागा पुतऴे, मंदिर, धम्मध्वज सुरुवातील अतिक्रमण जागेतच आसतात नंतर समाज रेठ्याने ती जागा रेग्युलर होतात, पण ३५ वर्षा पुर्वी उभा केलेला पंचशिल धम्मध्वज पाहाटेच्यापारी होत्याचे नव्हते झाले यामुऴे भु माफीया,व समाज सुधारकाच्या समाज सेवेचे सर्वस्थरातुन गोडवे गायले जाता आहे.

## धूत ट्रान्समिशन लिमिटेडने आयपीओसाठी सेबीकडे डीआरएचपी सादर केला

छत्रपती संभजीनगर - बेन कॅपिटलचा पाठिंबा असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या विद्युत तसेच इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांपैकी एक असलेल्या धूत ट्रान्समिशन लिमिटेडने, आपल्या आयपीओसाठी बाजार नियामक सेबीकडे आपला सुधारित मसुदा रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस - १ दाखल केला आहे.हा प्रस्तावित सार्वजनिक प्रस्ताव हा नवीन समभाग विक्री आणि विक्रीसाठी प्रस्ताव यांचे मिश्रण आहे. नवीन समभाग विक्रीमध्ये प्रत्येकी ₹२ दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सचा समावेश असून, त्यांची एकूण किंमत ₹१४०० कोटींपर्यंत आहे. तर, ऑफर फॉर सेलमध्ये प्रत्येकी ₹२ दर्शनी मूल्य असलेल्या १,६३,१०,७३३ इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.ऑफर फॉर सेलमध्ये प्रवर्तक आणि प्रवर्तक गटातील विक्री करणाऱ्या भागधारकांकडून विकल्या जाणाऱ्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. बीसी एशिया इन्व्हेस्टमेंट्स एक्सव्ही लिमिटेड ही कंपनी प्रत्येकी ₹२ दर्शनी मूल्य असलेले १,३१,९१,९०० पर्यंत इक्विटी शेअर्स विक्रीसाठी सादर करत आहे; तर यापूर्वी मंगलम कोलाइस प्रायव्हेट लि. म्हणून ओळखली जाणारी मंगलम कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी प्रत्येकी ₹२ दर्शनी मूल्य असलेले ३१,१८,८३३ इक्विटी शेअर्स विक्रीसाठी उपलब्ध करून देत आहे.

## अखंड इंधन पुरवठ्याची दिली हमी

छत्रपती संभाजीनगर: देशसेवा आणि जनसेवा हे ब्रीद कायम ठेवत, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने देशभरात पेट्रोल (एमएस), डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आपले ऑपरेशन्स आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुरू ठेवला आहे. अनेक भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर ही पावले उचलण्यात आली आहेत.अलीकडील काळात, अनेक राज्यांमध्ये हंगामी कृषी कामकाज आणि पीक कापणी मोहिमेमुळे इंडियनऑइलला पेट्रोलियम उत्पादनांच्या मागणीत लक्षणीय वाढ अनुभवायला मिळाली आहे. याशिवाय, इतर पुरवठादारांच्या तुलनेत कमी किंमतीमुळे किरकोळ ग्राहकांचे इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे स्थलांतर तसेच संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांचाही रिटेल इंधन केंद्रांकडे वाढता कल यामुळे अतिरिक्त मागणीचा दबाव निर्माण झाला आहे. इंडियनऑइल आपल्या विस्तृत देशव्यापी टर्मिनल्स, डेपो, पाइपलाईन्स, एलपीजी बॉटलिंग प्लांट्स आणि रिटेल आउटलेट्सच्या नेटवर्कद्वारे अखंड पुरवठा आणि वेळेवर पुनर्भरण कायम ठेवत आहे. "वी आर ऑलवेज देयर" या भावनेनुसार पुरवठा पथके, वाहतूक नेटवर्क, टर्मिनल ऑपरेशन्स आणि निवडक रिटेल आउटलेट्स २४x७ कार्यरत असून उत्पादनांची अखंड वाहतूक सुनिश्चित करत आहेत.

# शिवतांडा व उपळ्यात अवैध दारूसाठ्यावर धडक; ग्रामीण पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२४ मे - कन्नड ग्रामीण पोलिसांनी तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापेमार कारवाई करत अवैध दारूविक्री करणाऱ्यांविरोधात कारवाई केली. या कारवाईत गावठी हातभट्टी दारू व देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला असून दोघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली कारवाई शिवतांडा येथे करण्यात आली. दि. २२ मे रोजी सायंकाळी ७.१५ वाजेच्या सुमारास आरोपी ताराचंद महारु राठोड (वय ५५, रा. शिवतांडा ता. कन्नड) हा गावठी हातभट्टी दारू चोरट्या विक्रीच्या उद्देशाने ताब्यात बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून २० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू जप्त केली. या दारूची किंमत सुमारे २ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी पोना प्रदीप पवार यांच्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोना ठाकूर करीत असून कारवाई पोना बागुल यांनी केली. दुसरी कारवाई उपळा येथे करण्यात आली. दि. २३ मे रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास आरोपी विण मनोहर गायकवाड (वय ४५, रा. उपळा ता. कन्नड) हा देशी दारूच्या बाटल्या विक्रीच्या उद्देशाने ताब्यात बाळगत असल्याचे पोलिसांना आढळून आले. पोलिसांनी आरोपीकडून 'संजीवनी संत्रा' या देशी दारूच्या ९० एमएलच्या २० सिलबंद बाटल्या जप्त केल्या. जप्त मालाची किंमत ८०० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

याप्रकरणी पोलिस हेडकॉन्स्टेबल धिरजकुमार चव्हाण यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल एल. के. गवळी करीत आहेत. कारवाई पोहेका बी. ए. धनुरे यांनी केली.

## दोन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर कारवाई ; 14 आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२४ मे - कन्नड ग्रामीण पोलिसांनी तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापेमार कारवाई करत जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली. या कारवाईत एकूण १४ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करण्यात आले आहे.

पहिली कारवाई हरसवाडी येथे करण्यात आली. पोलिसांनी दि. २२ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास मित्रमिलन बुधल राठोड यांच्या सहाण जागेवर छापा टाकला. यावेळी आरोपी किरण आसाराम राठोड (वय ३४), संजय महादु तायडे (वय ४०), अरविंद किसन चव्हाण (वय २३) व मित्रमिलन बुधल राठोड (वय ४५, सर्व रा. हरसवाडी ता. कन्नड) हे 'झन्ना मन्ना' नावाचा जुगार खेळ खेळत व खेळवत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी आरोपींकडून एकूण १ हजार ४०० रुपये रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त केले. याप्रकरणी पोना प्रदीप पवार यांच्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक ठाकूर करीत आहेत. ही कारवाई पोना बागुल यांनी केली

दुसरी कारवाई चापानेर येथे शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कुंपणालगत करण्यात आली. दि. २३ मे रोजी दुपारी १.१२ वाजेच्या सुमारास आरोपी कागदी चिठ्ठ्यांवर आकडे लिहून 'कल्याण मटका' जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार छापा टाकत पोलिसांनी अशोक कारभारी भाडाईत (रा. चापानेर), भास्कर रामचंद्र वाळुंजे (रा. खेडा), अशोक भागीनाथ दरेकर (रा. चापानेर), संजय साहेबराव तेलुरे (रा. जवळी बु.), रमेश ऊर्फ चांदी माणिक पेंढारकर (रा. चापानेर), प्रकाश भागीनाथ दरेकर (रा. चापानेर), कैलास कचरु निकम (रा. बोलटेक), भाऊसाहेब हरीश्चंद्र गायकवाड (रा. खेडा) व नंदू कचरु देवरे (रा. सिरसगाव ता. कन्नड) यांना ताब्यात घेतले.

या कारवाईत आरोपींकडून रोख ५ हजार ४५० रुपये, मटक्याच्या चिठ्ठ्या, बॉलपेन, कार्बन व अन्य जुगार साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी संदीप कनकुटे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार शरद चौधरी करीत आहेत. कारवाई बी. ए. धनुरे यांनी केली

## 18 व्या इंडिया हॅबिटॅट फिल्म फेस्टिव्हलमध्ये मराठी चित्रपट आशा ला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर : आशा आरोग्य सेविकांच्या प्रेरणादायी जीवनावर आणि त्यांच्या योगदानावर आधारित दीपक पाटील दिग्दर्शित मराठी चित्रपट आशा याच्या प्रदर्शनाला प्रतिष्ठित 18th India Habitat Film Festival मध्ये प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. India Habitat Centre येथे आयोजित या प्रदर्शनावेळी सभागृह खचाखच भरले होते. चित्रपटातील संवेदनशील मांडणी आणि सामाजिक आशयामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाचे विशेष कौतुक केले.

आशा हा चित्रपट ग्रामीण भागातील आशा आरोग्य सेविकांच्या अथक कार्यावर आधारित असून, जनजागृती, आरोग्य सेवा आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून मातामृत्यू दर कमी करण्यासाठी त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचे प्रभावी चित्रण करतो. या अग्रभागी काम करणाऱ्या आरोग्य सेविकांना भेडसावणाऱ्या आव्हानांसोबतच माता आणि बाल आरोग्य सुधारण्यासाठी त्यांचे समर्पण चित्रपटातून अधोरेखित करण्यात आले आहे.

चित्रपटाच्या वास्तववादी कथनशैलीला, प्रभावी अभिनयाला आणि तळागाळातील आरोग्य उपक्रमांवर आधारित प्रभावी संदेशाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. प्रदर्शनानंतर चित्रपटाच्या निर्मात्या दैवता पाटील यांनी प्रेक्षकांशी संवाद साधत चित्रपट निर्मितीचा प्रवास आणि आशा सेविकांचे जीवन वास्तववादी पद्धतीने मांडण्यासाठी करण्यात आलेल्या अभ्यासाविषयी माहिती दिली. अनेक प्रेक्षकांनी भारताच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या आशा सेविकांच्या दुर्लक्षित योगदानाकडे लक्ष वेधल्याबद्दल चित्रपटाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना फेस्टिव्हल संचालक, डॉक्टर के जी सुरेश म्हणाले, "आशा हा चित्रपट आशा आरोग्य सेविकांच्या असामान्य कार्यावर प्रकाश टाकणारा अत्यंत महत्त्वाचा चित्रपट आहे. हा चित्रपट केवळ मानवी भावना व्यक्त करणारी कथा सांगत नाही, तर तळागाळात काम करणाऱ्या महिलांनी घडवून आणलेल्या सामाजिक परिवर्तनाचेही प्रभावी दस्तऐवजीकरण करतो. प्रेक्षकांनी चित्रपटाशी इतक्या मोठ्या प्रमाणात भावनिक नाते जोडलेले पाहून आनंद होत आहे." निर्मात्या दैवता पाटील म्हणाल्या, "हा चित्रपट अत्यंत कठीण परिस्थितीतही माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या आशा सेविकांच्या जिद्दीला आणि समर्पणाला वाहिलेली आदरांजली आहे. फेस्टिव्हलमध्ये मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक असून, प्रदर्शनानंतर झालेल्या संवादातून प्रेक्षक चित्रपटातील भावनिक आणि सामाजिक वास्तवाशी किती खोलवर जोडले गेले आहेत, हे जाणवले."

**राष्ट्ररक्षा**

# इंटरनेटवरही इराणचा टोल?

## समुद्राखालील केबलमुळे जगाची डेटासेवा संकटात

**ब्रिगेडियर हेमंत महाजन**/ ९०९६७०१२५३

समुद्राखाली टाकण्यात आलेल्या इंटरनेट केबल्सच्या ऑपरेटर्सकडून इराणी सागरी क्षेत्रात प्रवेशासाठी शुल्क आकारण्याचा प्रस्ताव इराण सरकारने मांडला. इराणच्या वक्तव्यामुळे इंटरनेट आणि जागतिकीकरणाच्या त्या पायाभूत रचनेकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. समुद्राखाली ५००हून अधिक केबलचे जाळे असून त्याच माध्यमातून जगातील ९५ टक्क्यांहून अधिक आंतरराष्ट्रीय डेटा वाहतूक चालते.

पश्चिम आशियातील लाल समुद्र, बाब-अल-मंदेब, होर्मुझ सामुद्रधुनी, सुएझ कालवा हे अरुंद सागरी मार्ग डिजिटल चोकपॉईंट्स म्हणूनही कार्य करतात. हे सागरी मार्ग युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील आर्थिक केंद्रांना जोडतात. २०२४ मध्ये तांबड्या समुद्रातील समुद्री केबल्सशी संबंधित घटनांमुळे युरोप व आशियामधील सुमारे २५ टक्के इंटरनेट सेवेवर परिणाम झाला होता. या केबल्स जगाच्या अर्थकारणासाठी महत्त्वाच्या आहेत.

### डिजिटल पायाभूत सुविधा

पूर्वी महत्त्वाच्या पायाभूत सुविधांमध्ये तेलवाहिन्या, बंदरे किंवा वीज ग्रीड यांचा समावेश होत असे; मात्र आता डेटा पायाभूत सुविधाही राष्ट्रीय आणि आर्थिक सुरक्षेसाठी तितक्याच महत्त्वाच्या बनल्या आहेत. समुद्राखालील केबल्समधील मोठी समस्या म्हणजे पायाभूत सुविधांचे केंद्रीकरण. अनेक केबल्स समुद्रतळावर एकाच मार्गाने जातात आणि काही मोजक्या सागरी चोकपॉईंट्समधून बाहेर पडतात. एखादी केबल तोडण्यात आल्यास अनेक देशांमधील संपर्क व्यवस्था त्याने बाधित होऊ शकते.

### क्षेत्रांना अधिक फटका

पर्यायी पायाभूत सुविधा कमी असल्याने आफ्रिका, पश्चिम आशिया आणि दक्षिण आशियातील विकसनशील देशांना सर्वाधिक फटका बसू शकतो. आर्थिक बाजारपेठाही यापासून सुरक्षित राहणार नाहीत. जागतिक पेमेंट नेटवर्क्स आणि आंतरराष्ट्रीय बँकिंग व्यवहार विस्कळीत होतील. विमा, जहाज वाहतूक उद्योग आणि ऊर्जापुरवठा साखळ्यांनाही मोठ्या अनिश्चिततेला सामोरे जावे लागेल. ड्रोन ऑपरेशन्स, रसद नियोजनापर्यंत लष्करातील प्रत्येक यंत्रणांना याचा फटका बसू शकतो. यामुळे जगावरती काय परिणाम होईल? भारतावरही काय परिणाम होईल? येणाऱ्या काळामध्ये तेल किंवा गॅसची पाईपलाईन जी समुद्रामधून जाते त्याच्यावरती काय परिणाम होईल याचे विस्तृत विश्लेषण केले आहे.

### आधुनिक जगाची जीवनवाहिनी

आजचे जग तेल, वायू,व्यापारमार्गांवर व 'डेटा'वर चालते. जगातील सुमारे ९५ टक्के आंतरराष्ट्रीय इंटरनेट आणि डेटा वाहतूक समुद्राखालील फायबर-ऑप्टिक केबल्सद्वारे होते. या केबल्समुळे बँकिंग व्यवहार, शेअर बाजार, लष्करी संवाद, उपग्रह नियंत्रण, सोशल मीडिया, क्लाऊड सेवा, एआय डेटा सेंटर, ई-कॉमर्स आणि सरकारी संवाद सतत चालू राहतात. इराणने आपल्या सागरी क्षेत्रातून जाणाऱ्या समुद्राखालील केबलसवर शुल्क आकारण्याचा प्रस्ताव मांडल्याने जगाला अचानक लक्षात आले की, आधुनिक डिजिटल जगाची पायाभूत रचना किती असुरक्षित आहे.

### इंटरनेट केबल्सचे सामरिक महत्त्व

समुद्राखालील केबल्स म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या आहेत. यांच्याद्वारे स्विफ्ट (एसडब्ल्यूआयएफटी) बँकिंग व्यवहार, शेअर बाजारातील रीअल टाईम ट्रेडिंग, गुगल, मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन यांचे क्लाऊड नेटवर्क एआय सर्व्हर्सचे डेटा ट्रान्सफर, लष्करी संवाद, ड्रोन आणि सायबर ऑपरेशन्स उपग्रह डेटा व्यवस्थापन चालते. जर या केबल्स खंडित झाल्या तर जग 'डिजिटल अंधारात' जाऊ शकते.

### पश्चिम आशियातील 'डिजिटल चोकपॉईंट्स'

होर्मुझ, बाब-एल-मांडेब, सुएझ कालवा, लाल समुद्र हे मार्ग डेटा वाहतुकीचीही केंद्रे आहेत. कारण अनेक केबल्स एकाच मार्गाने जातात. पर्यायी मार्ग मर्यादित आहेत. युद्ध, दहशतवाद, समुद्री चाचेगिरी किंवा ड्रोन हल्ल्यांमुळे मोठे नुकसान होऊ शकते. २०२४ मध्ये लाल समुद्रातील घटनांमुळे युरोप-आशिया इंटरनेट सेवांवर मोठा परिणाम झाला होता.





### इराणचे धोरण : 'डेटा जिओपॉलिटिक्स'

इराण आता फक्त तेल आणि होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण ठेवत नाही; तर डेटा वाहतुकीवरही प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत आहे. इराणला यातून काय फायदा?

आर्थिक उत्पन्न -समुद्री क्षेत्रातून जाणाऱ्या केबलसवर शुल्क.

सामरिक दबाव-अमेरिका किंवा पाश्चिमात्य देशांवर दबाव निर्माण करणे.

डिजिटल युद्धातील शस्त्र-भविष्यात इंटरनेट कनेक्टिव्हिटीला युद्धातील 'लेव्हर' म्हणून वापरणे.

जगावर होणारे संभाव्य परिणाम

जागतिक अर्थव्यवस्था विस्कळीत

शेअर बाजार--हाय फ्रिक्वेन्सी ट्रेडिंग थांबू शकते. शेअर बाजारात घसरण. डॉलर व्यवहार उशिरा होतील.

बँकिंग संकट-एसडब्ल्यूआयएफटी नेटवर्क विस्कळीत, आंतरराष्ट्रीय पेमेंट थांबणे, क्रेडिट कार्ड व्यवहार अडथळे.

ई-कॉमर्स- ॲमेझॉन, अलीबाबा, फ्लिपकार्ट, लॉजिस्टिक्स नेटवर्क प्रभावित.

### क्लाऊड आणि एआय सेवा प्रभावित

आज एआय डेटा सेंटर अमेरिका, युरोप आणि आशियात जोडलेले आहेत. जर केबल्स खंडित झाल्या तर एआय मॉडेल्सचा डेटा प्रवाह मंदावेल. क्लाऊड सेवा बंद पडू शकतात, मायक्रोसॉफ्ट अझ्युर, एडब्ल्यूएस, गूगल क्लाउड यांच्यावर परिणाम होईल.

### लष्करी परिणाम

आधुनिक युद्ध डेटा-आधारित आहे-ड्रोन ऑपरेशन्स, उपग्रह नियंत्रण, मिसाईल ट्रॅकिंग, नौदल समन्वय, सायबर युद्ध हे सर्व फायबर नेटवर्कवर अवलंबून आहे.

परिणाम-सैन्याची प्रतिक्रिया मंदावेल, कमांड आणि कंट्रोलमध्ये अडथळे. माहिती युद्धात गोंधळ होईल.

भारतावर होणारे परिणाम-भारत हा जगातील सर्वांत वेगाने वाढणारा डिजिटल देश आहे.

भारताच्या इंटरनेट वाहतुकीचे केंद्र-मुंबई, चेन्नई, कोची या शहरांमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय केबल लँडिंग स्टेशन आहेत.

आर्थिक परिणाम-यूपीआय आणि डिजिटल इंडिया

भारताचे यूपीआय, ऑनलाईन बँकिंग, डिजिटल पेमेंट, स्टार्टअप इकोसिस्टम यावर परिणाम होऊ शकतो.

### आयटी उद्योगाला मोठा फटका

भारताचा आयटी आणि बीपीओ उद्योग अमेरिकन आणि युरोपीय डेटा नेटवर्कवर अवलंबून आहे. जर इंटरनेटची गती मंदावली तर सेवा वितरण उशिरा तसेच डेटा सेंटर ऑपरेशन्समध्ये अडथळे निर्माण होऊन अब्जावधी डॉलरचे नुकसान होईल.

### राष्ट्रीय सुरक्षेवरील परिणाम

भारताचे नौदल नेटवर्क उपग्रह डेटा, सायबर कमांड आयएसआर प्रणाली, गुप्तचर पाळत ठेवणे, हे सर्व प्रभावित होऊ शकते. भारतीय नौदलाला समुद्राखालील पायाभूत सुविधांचे संरक्षण, पाणबुडीविरोधी निगराणी, समुद्रतळ युद्धक्षमता वाढवावी लागेल. समुद्राखालील केबल्सवरील धोका वाढला तर पुढील लक्ष्य तेल पाईपलाईन, गॅस पाईपलाईन ऑफशोर एनर्जी प्लॅटफॉर्म्स होऊ शकतात.

नॉर्ड स्ट्रीम पाईपलाईन तोडफोड- पाईप लाईनच्या या तोडफोडीमुळे समुद्रामधील सुविधा सहज लक्ष्य बनू शकतात, हे सिद्ध झाले आहे. तसेच 'ग्रे झोन वॉरफेअर'चालू आहे, हे देखील कळून आले.

### भविष्यातील युद्ध

भविष्यात पाणबुड्या, पाण्याखालील ड्रोन, एआय-सक्षम घातपात प्रणाली, समुद्रतळ सेन्सर्स यांच्या माध्यमातून केबल्स तोडणे पाईपलाईन उडवणे, सेन्सर नेटवर्क नष्ट करणे हे युद्धाचे नवे स्वरूप बनेल. अमेरिका, चीन, रशिया आणि नाटो आधीच समुद्रतळ युद्धक्षमतेवर मोठी गुंतवणूक करत आहेत.

### काय सांगतो आंतरराष्ट्रीय कायदा?

संयुक्त राष्ट्र संघाच्या यूएनसीएलओएस (अनक्लॉज-युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑन द लॉ ऑफ द सी) अंतर्गत समुद्राखालील केबल्सना काही प्रमाणात संरक्षण दिलेले आहे.

(१) केबल टाकण्याचा अधिकार-देशांना आंतरराष्ट्रीय समुद्रात केबल टाकण्याचा अधिकार आहे.

(२) जाणीवपूर्वक नुकसान बेकायदेशीर-केबल्स तोडणे किंवा नुकसान करणे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन ठरू शकते.

(३) किनारी देशांचे अधिकार-इराणसारख्या देशांना पर्यावरणीय नियम, सुरक्षा नियम लागू करता येतात. मात्र ते संपूर्णपणे इंटरनेट वाहतूक रोखू शकत नाहीत.

### मोठी समस्या : कायदा जुना, युद्ध नवे

अनक्लॉज तयार झाला तेव्हा एआय तंत्रज्ञान नव्हते. डिजिटल अर्थव्यवस्था नव्हती, सायबर युद्ध नव्हते.

आज डेटा ही नवीन व्यवस्था-प्रणाली आहे. डिजिटल पायाभूत सुविधा राष्ट्रीय सुरक्षेचा भाग बनल्या आहेत. म्हणून नवीन आंतरराष्ट्रीय करारांची गरज निर्माण होत आहे.

### भारताने काय करावे?

बहुपर्यायी केबल नेटवर्क-भारताने पर्यायी मार्ग, इंडो-पॅसिफिक केबल कॉरिडॉर, अंदमान आणि निकोबार आधारित नेटवर्क वाढवावे.

सागरी सुरक्षा मजबूत करणे- भारतीय सैन्याद्वारे समुद्रतळाचे निरीक्षण, खोल समुद्रातील ड्रोन आणि पाण्याखालील सेन्सर्स यामध्ये गुंतवणूक करावी लागेल.

डेटा सार्वभौमत्व-भारताने स्वदेशी क्लाउड, सार्वभौम एआय पायाभूत सुविधा, देशांतर्गत डेटा राउटिंग यावर भर द्यावा.

### निष्कर्ष

२१व्या शतकातील युद्ध आणि अर्थकारणात 'डेटा' हे नवीन 'तेल' बनले आहे. इराणने उपस्थित केलेला प्रश्न हा भविष्यातील 'डिजिटल युद्धा'चा इशारा आहे. भविष्यात तेल, गॅस, इंटरनेट, सागरी पायाभूत सुविधा इत्यादी राष्ट्रीय सुरक्षेचा भाग बनतील. भारताची डिजिटल अर्थव्यवस्था आज मोठ्या प्रमाणावर परदेशी डेटा सेंटर, आंतरराष्ट्रीय क्लाऊड नेटवर्क आणि समुद्राखालील केबल्सवर अवलंबून आहे. त्यामुळे इराणने होर्मुझ किंवा पश्चिम आशियातून जाणाऱ्या इंटरनेट केबल्सवर टॅक्स, निर्बंध किंवा दबाव आणला तर त्याचा भारतावर परिणाम होऊ शकतो.

# विजयपथावर भगवा... तुष्टीकरणाला चपराक

पान १ वरून...

### आसामचा सुस्पष्ट आणि भक्कम जनादेश

आसामचा जनादेश हा या कथानकाचा दुसरा भक्कम आधारस्तंभ आहे. हे केवळ पुन्हा सत्ता प्राप्त करणे एवढ्या मर्यादित अर्थाने नाही तर, एका सीमावर्ती राज्याची राजकीय स्पष्टता आहे. आसामने हे दाखवून दिले आहे की, सीमावर्ती समुदायांना केवळ कल्याणकारी लाभांपेक्षा अधिक काहीतरी हवे आहे; त्यांना नागरिकत्वावर स्पष्टता, अवैध घुसखोरीवर धोरण, सांस्कृतिक संरक्षण, जनजातीय-सामाजिक संतुलन, कायदा आणि सुव्यवस्था आणि निर्णायक प्रशासनाची गरज इत्यादी विषयांना त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. सीमावर्ती प्रदेशांमध्ये, राष्ट्रवाद ही एक केवळ दूरची वैचारिक वस्तू नाही; तर तो भूमी, भाषा, अस्मिता, रोजगार आणि सुरक्षेचा दैनंदिन अनुभव आहे.

आसाममध्ये काँग्रेसची नेमकी याच मुद्यावर अडचण होत होती. जर एखादा पक्ष स्थानिक हिंदू, जनजाती समाज, भाषिक आणि सांस्कृतिक समस्या समजून घेण्याऐवजी केवळ अल्पसंख्यकांच्या समीकरणात आपले भविष्य शोधत असेल, तर चाणाक्ष जनता ते लगेच ओळखते. काँग्रेसची उमेदवार निवडण्याची रणनीती आणि मुस्लिम नेतृत्वाला निवडकपणे पुढे आणण्याची प्रवृत्ती या बाबी तिच्या समर्थकांना नैसर्गिक वाटत असल्या तरी काँग्रेसचे टीकाकार याला व्होट-बँकेचे राजकारण मानतात. समस्या प्रतिनिधित्वाची नाही, तर असंतुलनाची आहे. समस्या कोणत्याही समुदायाच्या सहभागाची नाही, तर बहुसंख्यक समुदायाच्या नैसर्गिक प्रश्नांना सामोरे जाण्यास कचरणाऱ्या राजकीय मानसिकतेची आहे.

### काँग्रेसची शोकांतिका

काँग्रेसची शोकांतिका ही आहे की, अमेठीत पराभव झाल्यानंतर ती वायनाडमध्ये आश्रय शोधत आहे. तथापि, याला केवळ एक भौगोलिक स्थलांतर म्हणून पाहणे ही एक चूक ठरेल. ही सामाजिक आत्मविश्वासाची कहाणी आहे. एकेकाळी जो पक्ष संपूर्ण भारतात अतिशय बळकट होता त्या पक्षाला आता आपल्याच मतदारांशी सहज, नैसर्गिकपणे संवाद साधणे अवघड होत आहे. हिंदू समाजाच्या मुद्यांना हात घालताना तो पक्ष सावध असतो, घुसखोरी आणि सीमा असुरक्षिततेवर बोलताना अडखळतो, जिहादी कट्टरतेवर भाष्य करताना आपल्या सल्लागारांकडे पाहतो आणि राष्ट्रवादावर बोलताना एकतर वरवरची भाषा बोलतो किंवा बचावात्मक पवित्रा घेतो. कोणताही पक्ष केवळ स्मारकांच्या जोरावर टिकू शकत नाही; त्याला भविष्याच्या भाषेचीही गरज असते.

वामपंथी पक्षांनी काँग्रेसची ही दुर्बलता आणखी खोलवर रुजवली. अविचारी भाजपाविरोधी राजकारण, संधीसाधू आघाड्या आणि सांस्कृतिक भारताविषयीचा जुना कडवटपणा यांनी काँग्रेसला विचारांनी नव्हे, तर संकोचाने भरून टाकले. वामपंथी पक्षांनी काँग्रेसी नेत्यांमध्ये असा भ्रम निर्माण केला की भारताला समजून घेण्यासाठी भारताची स्मृती, श्रद्धा-आस्था, जनचेतना आणि सांस्कृतिक आत्म्याशी संवाद साधण्याची गरज नाही; केवळ वर्गसंघर्ष, अल्पसंख्यक भय आणि सत्ताविरोधाची आयात केलेली भाषा पुरेशी आहे. त्याचे परिणाम सर्वांसमोर आहेत. देशातील सर्वांत जुन्या पक्षाच्या खांद्यावर आता इतिहासाची शाल आहे, पण पायात भविष्यासाठी पाऊले नाहीत.

### डाव्यांचा अखेरचा बालेकिल्ला कोसळला

केरळमधील निकाल एक वेगळाच संदेश देतात. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ सत्तेवर आली, तर एलडीएफचा दणदणीत पराभव झाला. केरळमध्ये विरोधी पक्षांनी सत्ताधारी आघाडीचा पराभव करून डाव्यांच्या अखेरच्या बालेकिल्ल्यांपैकी एक उद्ध्वस्त केला. भाजपानेही केरळमध्ये तीन जागा जिंकून एक प्रतीकात्मक पण ऐतिहासिक प्रवेशाची नोंद केली.

केरळमधील वामपेथी पक्षांचा पराभव हा केवळ जागांची कमतरता नसून, तो वैचारिक मरगळीचे प्रतिबिंब आहे. जी विचारधारा एकेकाळी स्वतःला गरिबांची, कामगार-मजुरांची आणि नैतिक राजकारणाची रक्षक म्हणून सादर करीत होती, तीच सत्तेत आल्यावर मुख्यमंत्री कार्यालयापासून ते सोन्याची तस्करी, भ्रष्टाचाराचे आरोप,



वशिलेबाजीचे जाळे आणि वैचारिक दुटप्पीपणाच्या कथांपर्यंतच्या वादांमध्ये अडकून पडली. यातील 'आध्यात्मिक बारकावा' हा आहे की, प्रत्येक विचार अखेरीस त्याच्या कृतीतूनच फळ देतो. जर आत लोभ असेल, तर बाहेरून क्रांतीची पोस्टर्स कितीही लाल असली तरी तो रंग फिका पडेल. जर कोणी सरकारी तिजोरी लुटून काही आणे वाचवत असेल आणि त्याला भांडवल म्हणत असेल तर अशी व्यक्ती नेहमीच दया आणि उपहासाला पात्र ठरते. भारतातील वामपंथी पक्षांनी स्वतःच्याच मृत्यूची पटकथा लिहिली. भारताचा सांस्कृतिक आत्मा समजून घेण्याऐवजी त्यांनी वर्गसंघर्षाच्या आयात केलेल्या चष्म्यातून समाजाकडे पाहिले. त्यांना मंदिरांमध्ये अंधश्रद्धा दिसली, पण समाजाची स्मृती नाही; त्यांना जात दिसली, पण सांस्कृतिक सुधारणेची आंतरिक शक्ती नाही; त्यांना भांडवलशाहीला विरोध करायचा होता, पण सरकार नियंत्रित नफाखोरी आणि संघटित भ्रष्टाचारासमोर त्यांचा नैतिक आवाज क्षीण झाला. सोव्हिएत युनियनचा प्रयोग पार फसला. चीनने भांडवलशाही, खाजगीकरण या गोष्टी स्वीकारूनही अनेक दशके उलटली तरीही भारतातील वामपंथी पक्षाच्या नेत्यांना काळानुसार चालण्याची बुद्धी झाली नाही. त्यांचे राजकारण पारंपरिक चौकटीतच अडकले. युरोपमधील सांस्कृतिक डावे अस्मितेच्या राजकारणाच्या चक्रव्यूहात असेच अडकले होते. भारतातील वामपंथी पक्षांनी आधुनिक समाजप्रवाह ओळखला नाही, आपल्या जुनाट कार्यपद्धतीत बदल केला नाही. भ्रष्टाचाराने हे पक्षही आतून पोखरले गेले, त्यांचा जनमतेशी असलेला संवाद तुटला आणि अखेर याच जनतेचा विश्वास गमावल्यामुळे त्यांचा केरळमधील उरलासुरला बालेकिल्लाही साफ कोसळला. भारतातील डावे पक्ष भारताला भारतीय दृष्टिकोनातून पाहू शकले असते का? याचे उत्तर जितके संक्षिप्त आहे, तितकेच त्याचे परिणाम दूरगामी आहेत.

### तामिळनाडूतील परिवर्तन

तामिळनाडूत जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाने १०८, द्रमुकने ५९, अण्णद्रमुकने ४७, काँग्रेसने ५ आणि पीएमकेने ४ जागा जिंकल्या. अभिनेता विजयच्या उदयाकडे केवळ सेलिब्रिटी राजकारण म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. सिनेमा आणि सत्ता यांच्यातील संबंध ही दक्षिण भारताच्या राजकीय इतिहासातील एक जुनी परंपरा आहे. पण प्रत्येक तेज म्हणजे सूर्योदय नव्हे; कधीकधी तो केवळ रंगमंचावरील प्रकाश असतो. भारतातील तरुण पिढी नव्या प्रतीकांच्या शोधात आहे. नवयुवक-युवती थकलेल्या-मरगळलेल्या चेहऱ्यांना, जुन्या घराण्यांना आणि एकसुरी भाषणांना कंटाळले आहेत. अशा वेळी, कृत्रिम करिष्मा, सेलिब्रिटी प्रतिमा, सोशल अभियांत्रिकी आणि माध्यमांमधील नवे राजकारण यांचे आकर्षण खूप लवकर काम करते. येथे सावधगिरी बाळगण्याची गोष्ट ही आहे की, प्रत्येक नवीन चेहरा हा राष्ट्रीय हिताचा समानार्थी शब्द नसतो. आम आदमी पार्टीसारख्या बनावट कठपुतळ्यांची खोटी प्रतिमा कशी उघडकीस आली हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. नव्या राजकारणाचा दावा करणारा प्रत्येक प्रयोग जनतेच्या ऊर्जेचे प्रतिनिधित्व करतोच असे नाही; कधीकधी, तो एका मोठ्या वैचारिक खेळासाठीचा मुखवटा देखील असू शकतो. पुदुचेरीने एक छोटा पण अर्थपूर्ण संकेत दिला. इथला संदेश असा आहे की, जिथे राष्ट्रीय पक्ष स्थानिक नेतृत्वाचा आदर करतात, तिथे स्वीकृती मिळते. भाजपाच्या याच समीकरणामुळे रालोआला पुदुचेरीमध्ये पुन्हा सत्ता प्राप्त झाली आहे.

(पांचजन्यवरून साभार)